मंगळवार, २१ फेब्रुवारी २०२३
⊙ किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१७७
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● TUESDAY 21 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-177 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5



१८१ दिवस
मुदत ठेवीवर मिळवा
11% व्याजदर
* नियम व अटी लागू
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक
राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
चंदुलाल बियाणी
चेअरमन

कार्यरत शाखा :

मुख्य कार्यालय व शाखा : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072178/88
पंचशिल नगर शाखा : विद्यानगर जलालपूर रोड, पंचशिल नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072809
मुख्य शाखा विस्तारित कक्ष : ऊर्जा प्लाझा, गणेशपार रोड, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072181
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-१ : दिगंबर कॉम्प्लेक्स, नेहरू चौक (तळ), परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072180
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-२ उड्डान पुला जवळ, शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072805
सिरसाळा शाखा : बड़े निवास, जुने बस स्टँड रोड, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072184
अंबाजोगाई शाखा: प्रशांत नगर, बस स्टॅण्डच्या मागे, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072183
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-१ : मोहन कॉम्प्लेक्स, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072802
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-२ घाटनांदुर, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072808
बीड शाखा : जिजामाता चौक, मोंढा रोड, ता. जि. बीड. 9130072221
सोनपेठ शाखा : स्नेह सदन, विटा रोड, सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी. 9130072186
गंगाखेड शाखा : डॉक्टर लेन, एच.डी.एफ.सी. बँकेसमोर, गंगाखेड, जि. परभणी. 9130072807
विभागीय कार्यालय व महेश नगर शाखा : अपना बजार २०४ २०६, आकाशवाणी जवळ, औरंगाबाद 9130072176 / 77
राजा बजार शाखा : बालाजी मंदिर समोर, राजा बजार, शहागंज, मोंढा, ता. जि. औरंगाबाद. 9130072022
माळीवाडा विस्तारीत कक्ष : नाशिक रोड, माळीवाडा, ता. जि. औरंगाबाद. 9130072803

अंबड शाखा: जालना-बीड रोड, महावीर चौक, आंबड, जि. जालना. 9130072804
जालना शाखा : मेन बस स्टँड रोड, जालना, ता. जि. जालना. 9130072806
जालना विस्तारीत कक्ष-१ : जांगडे कॉम्प्लेक्स, जालना-अंबड रोड, ता. जि. जालना. 9130072226
नांदेड विस्तारीत कक्ष : पहिला मजला, गुरूकृपा मार्केट, महावीर चौक, ता. जि. नांदेड. 9130003070
उदगीर विस्तारीत कक्ष : पहिला मजला, लासूणे कॉम्प्लेक्स, देगलूर रोड, उदगीर, जि. लातूर. 9130072190
टोकवाडी विस्तारीत कक्ष: परळी-बीड रोड, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072224
दिंद्रुड विस्तारीत कक्ष : शेप कॉम्प्लेक्स, परळी-बीड रोड, दिंद्रुड, ता. माजलगाव, जि. बीड. 9130002070
लातूर विस्तारीत कक्ष : कव्हा रोड, शिवनेरी गेट जवळ, लातूर 9130002070
औराद विस्तारीत कक्ष : मेन रोड, कृष्णा ऑईल मिल समोर, औराद शहाजनी, ता. निलंगा, जि. लातूर. 9130003044
बीड विस्तारीत कक्ष : मोंढा मार्केट, संतोषी माता मंदिर समोर, बीड, ता.जि. बीड. 9130072221
उमरगा शाखा : शिवाजी महाविद्यालय जवळ, बालाजी नगर, मेन रोड, उमरगा, जि. उस्मानाबाद.
परभणी शाखा: कापसे भवन, कच्छी बजार, सरदार वल्लभभाई पटेल रोड, परभणी.
अहमदनगर शाखा: शॉप नं. ३ व ४ बेसमेंट, मोरया कॉर्नर, मोरया मंगल कार्यालय, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
केज शाखा : वकीलवाडी, कानडी रोड, केज, ता. केज. जि. बीड.
माजलगाव शाखा : गाळा क्र.८, सिद्धेश्वर कॉम्प्लेक्स, गढी कॉर्नर, गढी रोड, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड.

नियोजित शाखा : धर्माबाद, उमरखेड, नाशिक, पंढरपूर, रेणापूर, पुणे, अकोला

कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176, 9130072177


# कर्मचारी संपावर ठाम; प्रशासनाला घाम

## सरकार अपयशी : बारावी परीक्षा कर्मचाऱ्यांविना घ्याव्या लागणार

आधुनिक केसरी न्यूज

**शिवाजी निरमनाळे**

**लातूर : आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्यातील महाविद्यालयीन आणि विद्यापीठस्तरीय शिक्षकेतर कर्मचारी सोमवार 20 फेब्रुवारीपासून आपल्या मागण्या मान्य होईपर्यंत बेमुदत संपावर गेले आहेत. शिक्षकेतर कर्मचारी संपावर गेल्याने आणि मंगळवारपासून बारावी बोर्डाच्या परीक्षा सुरू होत असल्याने या परीक्षा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांविना घेताना महाविद्यालय प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागणार, हे वेगळे सांगायला नको. दरम्यान, टप्प्याटप्प्याने आंदोलन करूनही शासन आपली दखल घेत नाही, यामुळे या कर्मचाऱ्यांचा रोष आणखी वाढला आहे. सरकार मात्र हा संपावर तोडगा काढण्यात सपशेल अपयशी ठरले असल्याचे दिसून येत आहे. ऐन बोर्ड परीक्षेत हे कर्मचारी संपावर गेल्याने प्रशासन धास्तावले आहे.**

राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचारी आपल्या विविध मागण्यासाठी टप्याटप्प्याने आंदोलन करीत आहेत. त्यामध्ये २ फेब्रुवारी 2023 पासून सर्व परीक्षा विषयक कामकाजावर बहिष्कार, 14 फेब्रुवारी 2023 रोजी शासनाच्या विरोधात निदर्शने केली, 15 फेब्रुवारी 2023 रोजी काळ्या फिती लावून कार्यालयीन काम केले. १६ फेब्रुवारी रोजी एक दिवसाचा लाक्षणिक संप केला. परंतु या आंदोलनाची शासनाने कोणतीही दखल घेतली नसल्यामुळे सोमवार, २० फेब्रुवारी 2023 पासून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत सर्व जिल्ह्यातील सर्व अकृषी महाविद्यालय कर्मचारी या बेमुदत आंदोलनात सहभागी झाले आहेत. या आंदोलनाबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १५ फेब्रुवारी रोजी कृती समिती सोबत बैठक घेतली.




परंतु, शासनाकडून ठोस लेखी आश्वासन न मिळाल्यामुळे कर्मचारी वर्गात प्रचंड असंतोष निर्माण झाला असून कर्मचारी आंदोलनावर ठाम आहेत. दरम्यान, 21 फेब्रुवारी पासून बारावी बोर्डाच्या परीक्षा सुरू होत आहेत आणि यातच 20 फेब्रुवारीपासून सर्व शिक्षकेतर कर्मचारी संपावर जात गेल्याने परीक्षेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. शिक्षकेतर कर्मचारी हा महाविद्यालयाचा कणा असतो. त्यांच्यावरच महाविद्यालयाची महत्वाची कामे अवलंबून असतात. अशात ऐन बोर्ड परीक्षा काळात त्यांचा संप प्राचार्य आणि महाविद्यालयीन प्रशासनाची डोकेदुखी वाढणार हे मात्र नक्की. दयानंद शिक्षण संस्थे अंतर्गत चालणाऱ्या विविध महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी या संपात सहभागी आहेत. त्यात प्रामुख्याने दत्तात्रय आळंदकर, मनोज बाजपाई, नवनाथ भालेराव, सुनील खडबडे, दिलीप राठोड, बन्सी कांबळे, रुपचंद कुरे, बालाजी आडसूळ, राजेश सेलूकर, लक्ष्मीकांत वाघ, गीता चौधरी, सुरवसे यांच्यासह सर्व कर्मचारी सहभागी झाले होते. दरम्यान, शिक्षकेतर कर्मचारी यांनी पुकारलेल्या बेमुदत संपाला प्राध्यापकांची संघटना असलेल्या स्वामुक्टा आणि मुक्टा संघटनेने पाठींबा दिला आहे. स्वामुक्टाचे जिल्हा सचिव प्रा.डॉ. अमोल लाटे, मुक्टा संघटनेचे विभागीय अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन कोल्हापुरे यांनी दयानंद शिक्षण संस्थेतील शिक्षकेतर कर्मचारी यांच्या संप स्थळाला भेट देऊन आपला पाठींबा सोमवारी जाहीर केला आहे.

**लेखी आश्वासन आल्याशिवाय माघार नाही : धनराज जोशी** २ फेब्रुवारीपासून राज्यातील शिक्षकेतर कर्मचारी आपल्या मागण्यांसाठी आणि न्याय हक्कांसाठी टप्प्याटप्प्याने आंदोलन करीत आहेत .



मात्र, शासन याची दखल घेत नाही याचे मोठे दु :ख वाटते आहे . सत्तेच्या जीवावर कर्मचाऱ्यांच्या हिताचे कायदे मोडीत काढण्याचा सरकारचा प्रयत्न असून, या मुजोर शासनाला कर्मचाऱ्यांच्या हक्क आणि अधिकाराची जाणिव करुन देण्यासाठी, कर्मचाऱ्यांच्या हक्काची लढाई संघटना लोकशाही मार्गाने लढत आहे . मुजोर सरकार आमच्या मागण्या मान्य करण्यासाठी पुढाकार घेत नाही, याची खंत वाटते . काहीही झाले तरी मागण्या मान्य झाल्याशिवाय आणि लेखी आश्वासन सरकारने दिल्याशिवाय माघार घेणार नाही, अशी भूमिका अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे विभागीय कार्याध्यक्ष तथा नांदेड विद्यापीठाचे अधिसभा सदस्य धनराज जोशी ( जय भोले ) यांनी व्यक्त केली .

## महत्वाची बातमी

### निवडणूक आयोग बरखास्त करा; उद्धव ठाकरे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवसेना नाव आणि धनुष्यबाण चिन्ह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने शुक्रवारी दिला. निवडणूक आयोगाच्या या निर्णयानंतर राज्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे. विरोधकांकडून या निर्णयावर आक्षेप घेण्यात येत आहे. आता निवडणूक आयोगच बरखास्त करा, अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली आहे. त्यांनी आज पत्रकार परिषदेत अनेक मुद्यांवर भाष्य केले. यावेळी उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित केले आहेत. पक्ष आणि चिन्हाबाबत निवडणूक आयोगाने जो निर्णय दिला आहे तो निर्णय अयोग्य आहे. आयोगात चाकर असणाऱ्या लोकांची नेमणूक करण्यात आली आहे, असा निवडणूक आयोग बरखास्त करावा. कोर्टात यांची मनमानी चालणार, असे होणारे नाही. सध्या गुंतागुंत वाढावी म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे का? असा प्रश्न उपस्थित करत सध्याचा निवडणूक आयोग बरखास्त केला पाहिजे, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. आता 16 जण गेले त्यानंतर 23 अपात्र केल्याची नोटीस दिली आहे. दोन तृतीयांश एका पक्षात विलीन व्हायला हवेत मात्र तसे झालेले नाही. मधल्या काळात एक वादग्रस्त आयुक्त नेमले गेले आणि घाईघाईत त्यांची नियुक्ती कशी काय झाली, याचे उत्तर द्यायला हवे. निवडणूक आयोगाचा निर्णय अयोग्य आहे. गुंता वाढवण्यासाठी निवडणूक आयोगाने निर्णय दिला का? काँग्रेस आणि समाजवादी पार्टीत असाच वाद झाला होता. बाकी कुणालाही अशा प्रकारे देण्यात आलेले नाही. मधल्या काळात बातम्या आल्या की बोगस शपथपत्र आम्ही दिली आहेत.

# जिंतूर तहसील व पं.स. स्वच्छतागृहात घाणीचे साम्राज्य ?

## गुटखाबंदी नावालाच; स्वच्छतागृहात आरएमडी व इतर गुटखा पुड्या

आधुनिक केसरी न्यूज

बि.डी.रामपूरकर

जिंतूर : येथील स्वच्छता ग्रहात घाणीचे साम्राज्य दिसून येत असून सध्या शासन गाव हागणदारी मुक्त योजना राबवत असून तहसील पंचायत समिती मार्फत राबवली जाते. याच कार्यालयात स्वच्छता ग्रहात घाणीचे साम्राज्य असल्याचे दिसून येत आहे. याबाबत माहिती अशी की नेहमीच महिला व पुरुष अबाल वृद्ध शासकीय कामांसाठी तहसील पंचायत समिती या तालुक्याच्या मुख्य ठिकाणच्या कार्यालयात येत असतात. यासाठी जिंतूर हे अपवाद कसे? असा सवालही करण्यात येत असून त्यातच जिंतूर तहसील व पंचायत समिती मार्फत हागणदारी मुक्त योजना राबवली जात असून शासन त्यासाठी लाखो रुपयांचा निधी उपलब्ध करून देते, परंतु या कार्यालय प्रमुखांना त्यांचे वावडे दिसते की काय? असा प्रश्नही उद्भवतो याच कार्यालयातील संडास व मुतारी मध्ये घाणच घाण पसरलेली दिसून येते.




त्याचबरोबर या स्वच्छता ग्रहात जाळे पसरलेली असून सर्वत्र गुटखाबंदी असून देखील याच कार्यालयांच्या स्वच्छतागृहात आरएमडी व इतर गुटख्यापुड्या पाहावयास मिळतात. गुटखाबंदी कुठे ?असा प्रश्नही ग्रामीण भागातील नागरिकांना भेडसावतांना दिसतो. हा सर्व प्रकार पाहूनच ग्रामीण भागातील नागरिकांना तहसील व पंचायत समिती परिसरातील झाडाच्या आडोशाला लघु शंका करावी लागते. असल्याचे चित्र पहावयास



मिळते व संडास साठी कुठे जावे असा प्रश्नही ग्रामीण भागातील नागरिकांचा सवाल आहे. तसेच याबाबत शासकीय कामकाजासाठी आलेल्या महिलांनी कुठे स्वच्छता ग्राहात जावे. याबाबत तात्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे. सदर हागणदारी मुक्तीचा दिंडोरा पीटवणारे अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यालयात स्वच्छता कधी ठेवणार असा प्रश्नही जनतेतून उपस्थित केला जात आहे.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## स्वामी कृपा

आधुनिक केसरी

नितीन म्हणाला, 'पण तू स्वयंपाकाचे काम करणार ? मला योग्य नाही वाटत.'
रेश्मा म्हणाली, 'काय हरकत आहे ? कामात कसली आली आहे लाज ? कोणतेही काम सुरुवातीला छोटे वाटते पण एकदा सुरुवात झाली की हळूहळू काम वाढत जाते. आपलं काम चांगलं असलं की लोकांचा विश्वास वाढायला लागतो. व्यवसाय नावारूपाला येतो.'
नितीन म्हणाला, 'ठीक आहे. तुला योग्य वाटेल तसे कर.' रेश्माने स्थानिक वर्तमानपत्रातून आपल्या या छोट्या व्यवसायाची जाहिरात केली. घराच्या बाहेर बोर्ड लावला. एक नवी आशा, नवा हुरूप तिला मिळाला. जाहिरात करून काही दिवस होऊन गेले पण अजून म्हणावे तसे काम मिळत नव्हते. रेश्माच्या घराजवळच रंजनाताईंचा बंगला होता. तिथे सकाळी, संध्याकाळी काही मंडळी जाताना दिसत. रेश्माने त्याबद्दल लोकांना विचारले तेव्हा तिला कळले की त्याच बंगल्यात स्वामी समर्थांची एक मोठी प्रतिमा ठेवलेली असून लोक त्याठिकाणी त्यांची भक्ती करण्यासाठी, दर्शन घेण्यासाठी जातात. सकाळ, संध्याकाळ स्वामींची पूजा, आराधना, नैवेद्य, आरती आदी सोपस्कार होतात. रेश्माला हा शुभशकुन वाटला. आपल्या घराजवळ स्वामी समर्थांचा निवास आहे, ही गोष्ट तिला खूपच आनंद आणि समाधान देणारी ठरली. त्या दिवशी संध्याकाळी ती दर्शनासाठी तेथे जाऊन आली. तेथे खूपच प्रसन्न वाटले. रंजनाताई तर अतिशय प्रेमळ होत्या. त्यांनी रेश्माची मोठ्या आस्थेने चौकशी केली आणि तिला येथे येत जा म्हणून सांगितले. दुसऱ्या दिवशी गुरुवार होता. रेश्माने मेथीचे लाडू बनवण्याचे ठरवले होते. तिच्या मनात आले की स्वामींना मेथीच्या लाडूंचा नैवेद्य दाखवावा.





## आनंदी पहाट

### मनाची प्रगल्भता सुंदर विचारांमध्ये

आधुनिक केसरी

अन्न, वस्त्र आणि निवारा या मुलभूत गरजांची पूर्तता करण्यात आपण सदोदित मग्न असतो. अर्थातच त्यासाठी अर्थार्जन करणं अनिवार्य ठरतं. खरंतर ह्या तीनही आपल्या शारीरिक गरजा असतात. पण मग मनाचं काय ? ते असूनही त्याच्याकडे अनाहूतपणे दुर्लक्ष होत असतं. सद्यःस्थितीत सर्वप्रथम धन, तन आणि मग मन असा प्राधान्यक्रम ठरत चालला आहे. आपल्याच मनाचा अनेकदा मनातल्या मनात, मनाप्रमाणे, मनमुराद काही वेळा मन मारूनही मनोमन आपण विचार करतोच असं नाही. आपला नेहेमीच दृश्य गोष्टी करण्यावर अधिक भर असतो. कारण त्याच्यावर आपला भरवसा अधीक असतो. शारीरिक सौदर्य खुलवणे हे जितकं आपल्याला प्रिय असतं, तितकंच किबहुना थोडं अधिकच मानसिक स्वास्थ्य मिळवणं आणि ते टिकवून ठेवणं जरुरीचं असतं. आपल्या अंतर्मनातील विचारांना थोपवून धरणं तितकं सोपं नसतं, हे आपल्यापैकी प्रत्येकालाच ज्ञात आहे. शरीरावर ताबा मिळवणं आपल्याला शक्य होऊ शकतं, पण त्याच्यासाठी मनच कार्यरत राहावं लागतं. समजा, एकाच वेळेला १० व्यक्तींना एकसारख्या आणि एकाच प्रकारच्या शारीरिक हालचाली करायला सांगितल्या तर त्या ते सर्वजण अगदी नेमकेपणानं, हुबेहूब एकमेकांसारख्या हालचाली करतील. परंतु त्याच १० व्यक्तींना एका विशिष्ट विषयासंबंधी विचार करायला सांगितला तर तो कधीच समविचार, एकमेकांसारखा विचार यांच्या अंतर्मनात येऊ शकत नाही. हे विज्ञानाच्या प्रयोगाद्वारे स्पष्ट झालं आहे. दिवसेंदिवस वाढत जात असलेल्या मानसिक समस्या आणि त्यावर कराव्या लागणाऱ्या उपाययोजना ह्यांचा प्राधान्याने अभ्यासपूर्वक विचार करण्याची गरज आहे. आरोग्य संघटनेनं अलीकडेच केलेल्या पाहणीत काही आकडेवारी समोर आली आहे. त्यानुषंगाने आपल्या प्रत्येकालाच ह्या समस्येचा गांभीर्यानं विचार करावा लागणार आहे.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**नंदादीप झाला | ज्ञानदीप ||**
अंतरात ज्याच्या | ज्ञानदीप चेते ||
कैवल्याची होते | सिध्द भेट ||१||
वृक्षावरी फळ | बहरे रसाळ ||
गोडवा मधाळ | अमृताचा ||२||
मौन होते वाचा | येता अनुभूती ||
स्थिर होय मती | चरणासी ||३||
घालमेल शांत | झाली या मनाची ||
कृपा माऊलीची | भाग्योदय ||४||
विकारांचा तम | पळोनिया गेला ||
नंदादीप झाला | ज्ञानदीप ||५||


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

वय, ज्ञान, कर्म यांनी खूप मोठा हो. पण एक तरी जागा अशी राहू दे जेथे तू विनम्र होवून नमस्कार करशील.


तुला काय हवे ते मिळेल फक्त संयम आणि प्रयत्न यांच्या अनंत धारेचे उगमस्थान तू असला पाहिजेस. आधुनिक भाषेत याला Guts असे म्हणतात.


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

मनमोहक परपञ्च है, रचना ललित विशाल ।
एक अन्य आकर्ष में, बन्ध सम्बन्ध कि चाल
।।०९।। (स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय)
०४/०६/०९

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
हे मनमोहक दृश्य, सुंदर, विस्तृत रचना महान आहे. सर्व जीव एकमेकांच्या मोह-आकर्षणाच्या बंधनात जखडलेले आहेत. हा मोह-संबंध करणारी मायेची चाल कोणीही ओळखू शकत नाही.


स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी


"हिंदवी स्वराज्याच्या जाणत्या राजाचा आज जन्मोत्सव महाप्रतापी, महाज्ञानी,जनतेचा कैवारी अशा शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा करून आजच्या लेखनाला सुरवात करूया. मित्रांनो काय योगायोग आहे पहा आपण आज शिव जयंती साजरी करत आहोत आणि आपणं अभ्यासत असलेल्या ओवीतही "निर्विकल्पाची कल्पना समर्थ सांगत आहेत. म्हणजे ख-या अर्थाने आपण शिवाजी महाराज व समर्थाच्या विचारांच्या दिशेने जात आहोत असे मला वाटते. प्रत्येक संतांचे सांगणे आहे की जो पर्यन्त तुम्ही अविद्येच्या छाये खाली वावरता तो पर्यन्त आपल्या मनाचे व्यापार स्मृती, लक्ष,विचार, भावना व कल्पना या आकुंचित मी पणात केंद्रित असतात. म्हणून ब्रम्हपर्यन्त जाण्यासाठी मनाची निर्विकल्पाची धारणा असणे हे परमार्थात फार महत्त्वाचे आहे. माणसाचे मन जेव्हां ब्रम्हकेंद्रित बनते तेव्हा मन हे विद्येच्या छत्रछायेखाली वावरू लागते. ब्रम्हाशीं साक्षात स्पर्श होऊन त्याला विशालतेचे स्वरूप येते. आपण आतापर्यंत अनेक योगी महर्षी,ब्रम्हज्ञानी लोकांना पाहिले असेल किंवा वाचले असेल की त्यांच्या मनाची विशालता येवढी मोठी असते की चंचलपणाला त्याठिकाणी अजिबात थारा नसतो. आजच्या युगात ही संकल्पना मनामध्ये सतत ठेवत रहावी अशी अपेक्षा करून ऊद्याच्या ऊज्वल भारताचे स्वप्न पूर्ण पणे लोककल्याणकारी होवो ही अपेक्षा.


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## नामस्मरण, शरणागती आणि भगवत्प्राप्ती

आधुनिक केसरी

भगवत्प्राप्तीला शरणागतीशिवाय मार्ग नाही, आणि शरणागतीला नामस्मरणासारखा उत्तम उपाय नाही. शरणागती म्हणजे, 'मी कर्ता' हा अभिमान नाहीसा होऊन, 'सर्व कर्तृत्व परमेश्वराचे आहे' ही दृढ भावना होणे. नामाशिवाय इतर साधनांत 'कृती' आहे; म्हणजे 'मी कर्ता' या अहंकाराला वाव आहे. स्मरण हा मनाचा धर्म असल्याने त्यात कृतीचा प्रश्नच येत नाही, म्हणून त्यात अहंकाराला वाव नाही; शिवाय, स्मरण किंवा विस्मरण या दोन्ही गोष्टी आपल्या हातात नाहीत; म्हणून नामाचे स्मरण झाले तरी त्यात स्वतःचे कर्तृत्व नसते, त्यामुळे 'मी कर्ता' ही जाणीव टिकू शकत नाही. 'मी नामस्मरण करतो' हा शब्दप्रयोगसुद्धा बरोबर नाही, कारण नामाचे स्मरण 'होत असते,' ते 'करू' म्हणून जमत नाही. म्हणून शरणागतीला नामस्मरणासारखे दुसरे साधन नाही. शरणागतीचा दुसरा अर्थ म्हणजे कायिक, वाचिक आणि मानसिक क्रिया थांबविणे. क्रिया न करणे हे कृती करण्यापेक्षा केव्हाही जास्त सोपे आहे; म्हणजेच शरणागती ही सहज-साध्य वाटली पाहिजे. पण अनुभव तसा येत नाही. जी गोष्ट अत्यंत सोपी वाटते ती करायला पुष्कळदा कठीण जाते असा अनुभव येतो. एखाद्याला मोटार वेगात चालव म्हटले तर तो ते सहज करील, पण अती हळू चालव म्हटले तर ते फार कठीण जाते. म्हणून काहीही कृती न करणे हे कृती करण्यापेक्षा फार कठीण असते. गीतेत भगवंतांनी अर्जुनाला 'तू नुसता मला शरण ये' असे सांगितले आहे. देहबुद्धी गेल्याशिवाय शरणागती येत नाही. देहबुद्धी, वासना, अहंकार ही सर्व एकच आहेत. जगातल्या वैभवाची आसक्ती आणि परमात्मप्राप्ती या दोन्ही गोष्टी एकत्र असूच शकत नाहीत. म्हणूनच उद्धवाला श्रीकृष्णांनी एकांतात जाऊन हरिचिंतन करायला सांगितले आणि असे केल्यानेच माझी तुला खरी प्राप्ती होईल असे म्हणाले. याचा अर्थ हाच की, जगाकडे पाठ फिरविल्याशिवाय भगवंत मिळत नाही. भगवंताच्या प्राप्तीचे नियम आणि व्यवहारातल्या वस्तू प्राप्त करून घेण्याचे नियम यांमध्ये फरक आहे. मनामध्ये वासना उत्पन्न झाली असता ती तृप्त करून घेण्यासाठी देहाची आणि वस्तूंची हालचाल करणे, हा व्यवहार होय. सूक्ष्म वासना देहाच्या साह्याने जड बनणे हे व्यवहाराचे खरे स्वरूप आहे. परंतु भगवंताचे याच्या उलट आहे. भगवंत हा अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे, त्याची प्राप्ती करून घेणे म्हणजे जडामधून सूक्ष्माकडे जाणे होय. तेव्हा त्याचे साधन हेही जडामधून सूक्ष्माकडे पोहोचविणारे असले पाहिजे. जड देहाशी संबंधित आणि सूक्ष्माशी निकट चिकटलेले असे साधन असेल तर ते नामच होय. **आजचे बोधवचन आहे – अनन्यतेशिवाय भगवंताची प्राप्ती नाही; त्यातच भक्ति जन्म पावते. श्रीराम समर्थ**



## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**आहे तें सकळ कृष्णा चि अर्पण । न कळतां मन दुजें भावी ॥१॥**
**म्हणउनी पाठी लागतील भूतें । येती गवसीत पांचजणें ॥ध्रु.॥**
**ज्याचे त्या वंचलें आठव न होतां । दंड या निमित्ताकारणें हा ॥२॥**
**तुका म्हणे काळें चेंपियेला गळा । मी मी वेळोवेळा करीतसे ॥३॥**
**महारासि सिवे । कोपे ब्राम्हण तो नव्हे ॥१॥**
**तया प्रायश्चित्त कांहीं । देहत्याग करितां नाहीं ॥ध्रु.॥**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, २१ फेब्रुवारी २०२३



# परराष्ट्रमंत्री जयशंकर यांची टीका

आधुनिक केसरी

पंतप्रधान मोदींवर वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या अमेरिकन अब्जाधीश जॉर्ज सोरोस यांच्यावर परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी टीका केली आहे. सोरोस न्यूयॉर्कमधील ज्येष्ठ, श्रीमंत आणि धोकादायक व्यक्ती आहे. आपल्या मताप्रमाणे संपूर्ण जगाचे काम चालावे असे त्यांना वाटते अशा शब्दात परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी मेरिकन अब्जाधीश जॉर्ज सोरोस यांच्यावर हल्ला केला आहे.  अदानी- हिंडनबर्ग प्रकरणाबद्दल मोदी शांत आहेत. पण त्यांना परकीय गुंतवणूकदारांकडून आणि संसदेत विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील. यावर जयशंकर यांनी सोरोस यांना प्रत्युत्तर देताना म्हटले आहे की, आपल्या आवडीच्या व्यक्तीने निवडणूक जिंकावी असे मतदाराला वाटते. परंतु त्याच्या आवडीचा उमेदवार निवडून आला नाही तर ते मतदार निकालावर, उमेदवारावर आणि सत्ताधारी पक्षावर टीका करतात. पण निकाल काही वेगळा आला तर त्यांना देशाच्या लोकशाहीत उणीवा दिसतात. जगाने आपल्या हिशोबाने चालावे असे त्यांना वाटते. भारत हा एक लोकशाहीचा आदर करणारा देश आहे. मात्र या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे लोकशाही मानणारे नाहीत. उद्योजक गौतम अदानी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जवळचे सहकारी आहेत. अदानी यांच्यावर शेअर बाजारात गैरप्रकार केल्याचा आरोप आहे. या विषयावर मोदी शांत आहेत. पण त्यांना परकीय गुंतवणूकदारांकडून आणि संसदेत विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील. तसेच मुस्लिम समाजाविरोधात चिथावणी देणं हा त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा एक भाग आहे, असे सोरोस म्हणाले. जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत ते 254 व्या क्रमांकावर आहेत. सोरोस यांची वैयक्तिक संपत्ती 8.5 डॉलर अब्ज आहे. 1947 साली सोरोस युनायडेट किंगडममध्ये ळे. लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्स येथे त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी बँकेत नोकरी केली. त्यानंतर 1956 साली सोरोस न्यूयॉर्कला गेले. न्यूयॉर्कमध्ये वॉल स्ट्रीच येथे त्यांनी अनेक पदावर काम केले. त्यानंतर 1660 साली त्यांनी क्वांटम फंडची स्थापना केली.



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

# उच्चस्तरीय संशोधन व तांत्रिक कामगिरी कोणाची ?

आधुनिक केसरी

**ज्यांचा ब्रिटिश सरकारने सन १९३६मध्ये ऑर्डर ऑफ दि ब्रिटिश एम्पायर व सन १९४१मध्ये नाइट हा किताब देऊन गौरव केला. सन १९४३मध्ये लंडनच्या रॉयल सोसायटी व सोसायटी ऑफ केमिकल इंडस्ट्री या संस्थेचे सदस्य होण्याचा ज्यांना बहुमान मिळाला. इ.स.१९५४मध्ये भारत सरकारने ज्यांना पद्मविभूषण हा किताब देऊन गौरवले. ते विश्वविख्यात भारतीय रसायनशास्त्रज्ञ डॉ.शांतिस्वरूप भटनागर होत. त्यांच्या पावन जयंतीनिमित्त त्यांच्याविषयी अलककार- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींच्या लेखनशैलीतून ही ज्ञानवर्धक माहिती..**

डॉ.शांतिस्वरूप भटनागर हे भारतीय रसायनशास्त्रज्ञ होते. स्वातंत्र्योत्तर काळात भारताचा औद्योगिक विकास होण्याच्या दृष्टीने भारतात राष्ट्रीय प्रयोगशाळांची आणि वैज्ञानिक संशोधन केंद्रांची मालिका स्थापन करण्यात भटनागर यांनी बहुमोल कामगिरी केली. कौन्सिल ऑफ सायन्टिफिक अ‍ॅन्ड इंडस्ट्रियल रिसर्च- सीएसआयआरचे ते शिल्पकार होते. डॉ.शांतिस्वरूप भटनागर यांच्या नावाचा पुरस्कार भारतातील कौन्सिल ऑफ सायंटिफिक अ‍ॅन्ड इंडस्ट्रियल रिसर्च संस्थेतर्फे प्रदान करण्यात येतो. भटनागरजींच्या पश्चात तरुण भारतीय संशोधक व तंत्रज्ञ यांनी केलेल्या महत्त्वाच्या मूलभूत संशोधनाला योग्य मान्यता मिळवून देण्याच्या उद्देशाने हा पुरस्कार दरवर्षी देण्याचा प्रघात सन १९५७पासून पडला आहे. आजतागायत हा पुरस्कार सुमारे साडे चारशेच्या जवळपास शास्त्रज्ञांना देण्यात आलेला आहे. तो खुपच प्रतिष्ठेचा समजला जातो.

भारताला उच्चस्तरीय संशोधन कार्य आणि तांत्रिक कामगिरीच्या दिशेने नेणारे महान शास्त्रज्ञ डॉ.शांतिस्वरूप भटनागर यांचा जन्म दि.२१ फेब्रुवारी १८९४ रोजी पंजाबमधील शाहपूर जिल्ह्यात झाला, जो आता पाकिस्तानमध्ये येतो. त्यांचे वडील परमेश्वर सहाय हे शिक्षक होते. शांतिस्वरूप हे केवळ ८ महिन्यांचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. आईने संपूर्ण कुटुंबाची काळजी घेतली. त्यांचे बालपण सिकंदराबाद येथे अभियंता असलेले त्यांचे आजोबा प्यारेलाल यांच्यासोबत गेले. शांतिस्वरूपजी यांनी आजोबांकडे सुरुवातीचे शिक्षणच घेतले नाही, तर अभियांत्रिकीच्या कामातही त्यांना रस आणि कुतूहल निर्माण झाले. त्यांना भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र या विषयात रस होता. ते शाळेत असे प्रश्न विचारत, की जे शिक्षकांनाही थक्क करत असत. सन १९०८मध्ये श्री.परमेश्वर सहाय यांचे मित्र लाला रघुनाथ सहाय यांनी शांतिस्वरूपजींच्या अभ्यासाची जबाबदारी घेतली. तेव्हा ते लाहोरला त्यांच्याकडे आले. त्यांनी दयाल हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले, जेथे लाला रघुनाथ सहायजी हे प्राचार्य होते. शासकीय शिष्यवृत्ती स्पर्धेत भाग घेऊन त्यांनी शिष्यवृत्ती मिळवली. हळूहळू ते आत्मनिर्भर होऊ लागले. ते शाळेत मन लावून अभ्यास करत असत आणि घरी छोटे मोठे पार्टस बनवणे किंवा जुन्या वस्तूंना ठोकून मारून त्यांचे नवीन वस्तूत रूपांतर करत. तीन वर्षांत त्यांनी हायस्कूलची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली. पुढे त्यांनी लाहोरच्या दयालसिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यांचा अभ्यास अव्याहतपणे सुरू राहिला. प्रा.जगदीशचंद्र बसूंना भेटण्याची संधीही त्यांना मिळाली. त्यामुळे त्यांचे विज्ञानावरील प्रेम आणखी वाढले. सन १९१३मध्ये ते एफएससीमध्ये रुजू होऊन त्यांनी ती परीक्षा प्रथम विभागात उत्तीर्ण केली. दोन वर्षांनी त्यांनी रसायनशास्त्रात एमएससी पूर्ण केले. त्यांनी पदवीही मिळवली आणि दयालसिंग कॉलेजमध्येच अध्यापनाला सुरुवात केली. त्याच वर्षी लाला रघुनाथ सहाय यांची मुलगी लाजवंती हिच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यांना परदेशात शिक्षण घेण्यासाठी दयालसिंग ट्रस्टने शिष्यवृत्ती दिली आणि ते सन १९१९मध्ये लंडनला गेले. परदेशात त्यांनी इंग्लंड, फ्रान्स आणि जर्मनीतील शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली काम केले. त्यांच्या विलक्षण बुद्धिमत्तेने आणि प्रतिभेने सर्वांनाच वेड लावले होते. त्यांनी क्षारांची विद्राव्यता आणि त्याचा परिणाम या विषयावर लेखन केले व याच प्रबंधावर इ.स.१९२१मध्ये त्यांनी लंडन विद्यापीठाची डीएससी पदवी मिळवली. देशभक्त डॉ.भटनागरजी तेथून घरी परतले.

भारतात डॉ.भटनागरजींनी पंडित मदनमोहन मालवीय यांच्या विनंतीवरून बनारस हिंदू विद्यापीठात रसायनशास्त्राचे प्राध्यापकपद स्वीकारले. सन १९२४मध्ये ते लाहोर येथील पंजाब विद्यापीठात भौतिकीय रसायनशास्त्राचे प्राध्यापक व तेथील रसायनशास्त्रीय प्रयोगशाळेचे संचालक झाले. पुढच्या दोन वर्षात त्यांनी चुंबकीय रसायनशास्त्रातील संशोधनास प्रारंभ केला. या विषयाच्या अभ्यासात उपयुक्त असलेले चुंबकीय व्यतीकरण संतुलनमापक- मॅग्नेटिक इंटरफिअरन्स बॅलन्स हे उपकरण के.एन.माथूर यांच्या सहकार्याने त्यांनी तयार केले. त्याचे एकस्व- पेटंट मिळविले. इ.स.१९३६मध्ये त्यांनी स्टील ब्रदर्स या व्यापारी कंपनीला खनिज तेलासंबंधीच्या काही औद्योगिक समस्या सोडविण्यात संशोधन करून मौलिक मदत केली. या कार्याकरिता या कंपनीने दिलेल्या मोबदल्यातून त्यांनी पंजाब विद्यापीठात एक खास प्रयोगशाळा स्थापन केली. त्यामध्ये केरोसीनचे शुद्धीकरण, गंधहीन मेणाचे उत्पादन, वंगणे व वंगणक्रिया तसेच धातूंच्या क्षरणक्रियेला प्रतिबंधन यांसारख्या विविध समस्यांवर संशोधन केले. त्यानंतर अवघ्या सहा वर्षांत वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन मंडळाचे रूपांतर कौन्सिल ऑफ सायंटिफिक अ‍ॅन्ड इंडस्ट्रियल रिसर्च या संस्थेत झाले. भटनागरजींची या संस्थेचे पहिले संचालक म्हणून नेमणूक



झाली. ब्रिटिश सरकारने सन १९३६मध्ये ऑर्डर ऑफ दि ब्रिटिश एम्पायर व सन १९४१मध्ये नाइट हा किताब देऊन त्यांचा गौरव केला. सन १९४३मध्ये लंडनच्या रॉयल सोसायटी व सोसायटी ऑफ केमिकल इंडस्ट्री या संस्थेचे सदस्य होण्याचा त्यांना बहुमान मिळाला. इ.स.१९५४मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मविभूषण हा किताब देऊन गौरवले. डॉ.शांतिस्वरूप भटनागरजी यांचे वयाच्या ५१ वर्षी दि.१ जानेवारी १९५५ रोजी निधन झाले.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# जलप्रदूषण ; एक गंभीर समस्या

आधुनिक केसरी

**देशातील अनेक शहरांना प्रदूषणाने विळखा घातला आहे. दिल्लीसारख्या देशाची राजधानी असलेल्या शहराची प्रदूषणाने काय अवस्था झाली ते आपण पाहिलेच आहे आता देशाची आर्थिक राजधानी आणि आपल्या राज्याची राजधानी असलेल्या मुंबईची अवस्थाही दिल्लीसरखीच होताना दिसत आहे. देशातील सर्वाधिक प्रदूषित शहरात मुंबई दुसऱ्या स्थानावर आहे. मुंबईची हवा प्रदूषणाच्या सर्वोच्च पातळीवर पोहचली आहे. औद्योगिकीकरण व वाढत्या प्रदूषणामुळे हवेत विषारी वायू मिसळला जात आहे. त्यामुळे अनेक आजारांना निमंत्रण मिळत आहे. निसर्गाने मानवाला भरभरून दिले. हवा पाणी ही निसर्गाने मानवाला दिलेली देणगी आहे. पण मानवाने मात्र या देणगीचा आदर करण्याऐवजी त्यात ढवळाढवळ करण्यास सुरुवात केली त्यामुळेच प्रदूषणासारखी भीषण समस्या आज निर्माण झाली आहे.**

केवळ वायू प्रदूषण हीच आजची एकमेव समस्या नाही तर जलप्रदूषण ही देखील वायू प्रदूषणाइतकीच गंभीर समस्या बनली आहे. जगात सर्वात जास्त मृत्यू हे दूषित पाण्यामुळे होत आहे. संपूर्ण जगात १८० कोटी लोक दूषित पाणी पितात. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार भारतात ९ कोटीहून अधिक लोक दूषित पाणी पिल्यामुळे  आजारी पडतात. ग्रामीण भागातील सत्तर टक्के लोक दूषित पाणी पितात त्यामुळे ग्रामीण भागात दूषित पाण्यामुळे आजारी पडणाऱ्यांची संख्या अधिक आहे.  दूषित पाण्यामध्ये फ्लोराईडचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे मणक्याचे आजार होतात. हाडे ठिसूळ होतात. दात पिवळे पडतात. गॅस्ट्रो, हगवण, टायफॉईड, कावीळ यासारखे आजार उदभवतात. जलप्रदूषणाचा धोका फक्त मानवालाच आहे असे नाही. जलप्रदूषणाचा धोका जलचरांना देखील आहे. प्रदूषित पाण्यात ऑक्सिजनचे प्रमाण कमी असते. ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे जलचरांना देखील मोठा धोका निर्माण झाला आहे. एकूणच जलप्रदूषणामुळे जीवसृष्टीलाच धोका निर्माण झाला आहे. असे असूनही जलप्रदूषण कमी करण्यासाठी आपण गंभीर नाही असेच म्हणावे लागेल. कारण राज्यातील सर्वच नद्या प्रदूषणाच्या उच्चांकी पातळीवर पोहचले आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने आपल्या ताज्या अहवालात म्हटले आहे की देशातील २८९ नद्या ३११ ठिकाणांवर पोहचल्यानंतर प्रदूषित होतात. हा अहवाल अलीकडेच संसदेत सादर करण्यात आला आहे. हा अहवाल चिंताजनक आहे कारण या अहवालानुसार देशातील सर्वच प्रमुख नद्या व त्यांच्या उपनद्या प्रदूषित झाल्या असून त्यांचे पाणी पिण्यालायक राहिले नसल्याचे या अहवालात नमूद केले आहे. नमामी गंगा योजना आणि नदी संवर्धन योजनेमुळे नद्यांमधील प्रदूषण रोखण्यास मदत झाली असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. हा अहवाल मात्र सरकारचे हे म्हणणे खोडून काढतो. या अहवालानुसार महाराष्ट्रातील अनेक महत्वाच्या नद्या प्रदूषणाच्या उच्चांकी पातळीवर पोहचल्या आहेत. प्रदूषण महामंडळाने मागील वर्षी असाच एक अहवाल सादर केला होता त्यानुसार मुंबईतील मिठी व उल्हास या नद्या सर्वाधिक प्रदूषित नद्या म्हणून गणल्या गेल्या आहेत. विदर्भातील वैनगंगा, पैनगंगा, वर्धा या मोठ्या नद्यांसह वेण्णा, कन्हान नद्यांचाही प्रदूषित नद्यांमध्ये समावेश आहे. मध्यप्रदेशात उगम पावलेल्या वैनगंगा नदिचा तुमसर ते आष्टी पर्यंतचा ७०७ किमी चा परिसर अतिप्रदूषित म्हणून गणला गेला आहे. यामध्ये नागपूर जिल्ह्यातून वाहणाऱ्या नद्यांचाही सामावेश आहे. या



जिल्ह्यातील दुधुस ते राजुरा पर्यंतचा ५१ किलोमीटर पर्यंतचा विस्तार प्रदूषणाच्या उच्च श्रेणीत आहे. कन्हान नदीचा नागपूर ते भंडारा पर्यंतचा  १०१ किलोमीटरचा विस्तार अतिप्रदूषित श्रेणीत आहे. वेण्णा नदीही त्याच श्रेणीत असल्याचे दिसते. याशिवाय भीमा, कृष्णा, गोदावरी या मोठ्या आणि महत्वाच्या नद्या देखील प्रदूषित आहेत.  वारी निमित्त राज्यातील लाखो वारकरी पंढरपुरात न चुकता येतात आणि चंद्रभागेत न चुकता स्नान करतात ; पण आता चंद्रभागा नदीचे पाणी तीर्थ म्हणूनच काय तर स्नान करण्यासही धोकेदायक असल्याची माहिती समोर आली आहे. चंद्रभागा नदीच्या पाण्यात घाण, कचरा, शेवाळ, अळ्या, किडे आहेत तसेच ते पाणी मैला मिश्रित असल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. प्रदूषणामुळे देशातील नद्यांचे पाणी पिण्यालायक राहिले नाही. प्रदूषणामुळे केवळ मानावाच्याच नव्हे तर जलचरांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. अर्थात याला आपणच जबाबदार आहोत. नद्यांच्या काठावर वसलेल्या शहरातील केरकचरा, सांडपाणी, कारखान्यातील रसायन मिश्रित दूषित पाणी, सतत होणारा वाळू उपसा यामुळे नद्या प्रदूषित होत आहेत. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने नद्यांचे हे प्रदूषण रोखण्यासाठी ठोस पावले उचलायला हवीत. जे कारखाने आपल्या कारखान्यांमधून नद्यांमध्ये दूषित पाणी सोडत असतील त्यांचे परवाने रद्द करायला हवेत. वाळू उपसा थांबवायला हवा. जनतेनेही नद्यांमध्ये सांडपाणी सोडू नये.  जलप्रदूषण रोखायची जबाबदारी जितकी सरकारची आहे तितकीच ती जनतेचीही आहे. जल है तो कल है... या उक्तीप्रमाणे येणाऱ्या पिढीचे आणि जीवसृष्टीचे रक्षण करायचे असेल तर जलप्रदूषण रोखायलाच हवे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# औरंगाबादचा 'Industrial Revolution'च्या दिशेने प्रवास !

आधुनिक केसरी

**१९८५ साली औरंगाबाद येथे बजाज कंपनीचा प्लांट उभारण्यात आला आणि औरंगाबाद शहराला एक नवीन ओळख मिळण्यास सुरुवात झाली. यापूर्वी औरंगाबाद पर्यटन क्षेत्रात "पर्यटन राजधानी" म्हणून आपले स्थान कायम ठेवून होतेच.परंतु आता नव्याने "ऑटोमोबाईल इंडस्ट्रीयल हब" ही औरंगाबाद शहराची नवी ओळख झाली होती...**




भारत सोनवणे
मोबा. 9307918393


नव्वदीच्या दशकात औरंगाबाद शहराची बऱ्यापैकी अर्थव्यवस्था ही औद्योगिक वसाहतीत नव्याने निर्माण झालेल्या कंपन्यांनवर अवलंबून होती. यात मुख्यत्वे बजाज कंपनी ही त्यावेळी औरंगाबाद शहरासाठी खूप महत्त्वाची कंपनी होती, जी आजही आहे. शेकडो कंपन्या आजमितीला शहराच्या चहूबाजूने औद्योगिक वसाहतीत उभारल्या गेल्या आहे.औरंगाबाद शहरातील काही जुने लोकं आजही म्हणतात की, दिवाळीच्या दिवसांमध्ये जोवर बजाज कंपनीतील कामगारांना बोनस मिळत नाही तोवर शहराची बाजारपेठ ही थंडावलेली असायची. ज्या दिवशी दिवाळीचा बोनस कंपनीतून कामगारांना मिळत असायचा त्या दिवशी बाजारपेठ बघण्यासारखी फुललेली असायची. अर्थात औरंगाबाद शहराचे अर्थकारण हे या कंपनीच्या चक्रावर फिरत असायचे, इतका रोजगार त्यावेळी बजाज माध्यमातून कामगारांना बजाज कंपनी देत होती. त्यामुळेच कदाचित औरंगाबादकरांचे "हमारा बजाज"शी एक भावनिक नाते आहे..! असो बजाज कंपनीला घेऊन मी औरंगाबाद शहराची ऑटोमोबाईल क्षेत्रातील एक नवीन ओळख थोडक्यात सांगितली. आजमितीला अश्या अनेक कंपन्या या औरंगाबाद शहराशी जोडल्या गेल्या आहेत. औरंगाबाद शहराला एक नवीन ओळख देण्याचं काम यासर्व कंपन्या करत आहे. माझ्यामते जवळजवळ बऱ्यापैकी औरंगाबाद शहराची अर्थव्यवस्था, आर्थिक उलाढाल ही औद्योगिक वसाहतीत उभारलेल्या कंपन्यांच्या बळावर औरंगाबाद शहर करत आहे. आशिया खंडात एक नवी ओळख औरंगाबाद शहराला नव्वदीच्या दशकातच "ऑटोमोबाईल इंडस्ट्रीयल हब" ही ओळख वाळूज एमआयडीसी, चिखलठाण एमआयडीसी, चितेगाव एमआयडीसी, रेल्वे स्टेशन परिसरातील एमआयडीसी, रांजणगाव एमआयडीसी, शेंद्रा औद्योगिक वसाहत यांनी दिली. पंचतारांकित औद्योगिक वसाहत म्हणजेच दिल्ली आणि मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉरम यांच्या संयुक्त विद्यमाने आलेला 'ऑरिक आधुनिक वसाहत' हा प्रकल्प याची एक नवीन भर पडली आहे. उद्योग वाढीला, उद्योग क्षेत्रातील गुंतवणूकीला विविध कंपन्यांना औरंगाबाद शहरात एक मोठी स्पेस, प्लेटफॉर्म उपलब्ध झालेला आहे. बरेच देश विदेशातील नवीन प्रकल्प ऑरीकच्या माध्यमातून समोर येत आहे आणि यामुळे मोठ्या प्रमाणात उपलब्ध झालेला रोजगार. इंडस्ट्रीयल कॉरिडॉर असल्यामुळे औरंगाबादचा औद्योगिक क्षेत्रातील विकास पुढील काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढलेला असेल,यात शंका नाही.औरंगाबाद शहर औद्योगिक वसाहतींचे शहर म्हणून जो आलेख रेखाटला गेला आहे तो नियमित उंचावत राहीलेला असेल. 'ऑरिक सिटी' हा केंद्र सरकारचा हा एक महात्वाकांशी प्रकल्प आहे. देशातील स्मार्ट औद्योगिक वसाहतीमध्ये ऑरीक सिटी आणि संबंधित औद्योगिक समुहांचे प्रामुख्याने यामध्ये नाव घेतली जाते. जपान सरकारच्या सहकार्याने भारतात राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पात विकास, अतिउच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा उभारण्याचे जे लक्ष होते ते पुर्णपणे पुर्णत्वास आले आहे. औरंगाबाद शहरात ज्याप्रमाणात ऑटोमोबाईलशी निगडित कंपन्यांना येण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. तेव्हढ्या प्रमाणात कुठेतरी आयटी क्षेत्रात असलेल्या कंपन्यांना, प्रकल्पांना प्राधान्य दिलेले दिसत नाही. ही एक खंत कायम वाटते.

आयटी क्षेत्रातसुद्धा आपल्या शहराचा आलेख हळूहळू का होईना गेले काही वर्ष उंचावता आहे, बऱ्याच छोट्या-छोट्या कंपन्या या औरंगाबाद शहरात आयटी पार्कमध्ये आपली नावे करत आहेत. परंतु काळाची गरज ओळखून याबाबतीत लवकरच मोठे निर्णय घेतल्या गेले तर औरंगाबाद शहराच्या विकासास चालना मिळेल. या क्षेत्रातील कंपन्यांना जर औरंगाबाद शहरात स्थान दिले, ते आणण्यासाठी प्रयत्न केले. तर बराच सुशिक्षित बेरोजगार तरुण आपले कौशल्य दाखवून या क्षेत्रातही रोजगार मिळवू शकतो. यामुळे औरंगाबाद शहराला अजून एक नवी ओळख आय टी हबच्या रूपाने मिळेल हे सगळं आणि औरंगाबाद शहराचे अर्थकारण बघता "रिअल इस्टेट" क्षेत्रातसुध्दा शहर कसे मागे राहील. गेल्या दोन दशकात औरंगाबाद शहरातील नागरिकांनी रिअल इस्टेट विश्वात केलेली गुंतवणूक आणि त्यामुळे गृहनिर्माण संस्थांचे उभे राहिलेले असंख्य प्रोजेक्ट्स,फ्लॅट सिस्टम,रो-हाऊसेस यांच्या गगनाला भिडलेल्या किंमती हे सगळं विचार करायला लावणारं आहे. औरंगाबाद शहर कोणत्या दिशेनं वाटचाल करत आहे हा ही विचार अश्यावेळी मनात येऊन जातो. आशिया खंडात सर्वाधिक महाग रेडी पोझिशन घरांच्या किंमती असो किंवा जागेच्या किंमती यांची नोंद असलेल्या यादीतसुद्धा औरंगाबाद शहर पुणे शहराची बरोबरी करू बघत आहे.

औरंगाबाद शहराच्या लगत जाणारा समृद्धी महामार्ग जो की खूप भव्यदिव्य असा आहे ज्यामुळे दळणवळण करणे अजूनच सोयीचे झाले आहे. औरंगाबाद शहरातील विमानतळ तेथून होणारी आयात-निर्यात हे सर्व लक्ष वेधून घेणारं आहे. शहराचा दिवसेंदिवस वाढणारा विस्तार आणि औरंगाबाद शहराचे बदलणारे रूप नक्कीच औरंगाबाद शहराची वाटचाल ही आशिया खंडातील एक महत्त्वपूर्ण शहर आहे या दिशेनं होणारी आहे.

औरंगाबाद शहरात उपलब्ध झालेला रोजगार आणि एकीकडे कोरोनोत्तर काळात उद्योग विश्वात झालेला बदल,नवीन रुजु झालेल्या संकल्पना अन् पुन्हा एकदा आता औरंगाबाद शहराजवळील औद्योगिक वसाहती नव्यानं येणाऱ्या कंपन्यांचा चढता आलेख,कोरोनाच्या वाईट काळातील दिवसांना अनुभवत पुन्हा पुर्ववत औद्योगिक वसाहतींमध्ये चालु झालेला कारभार या सर्व गोष्टी औरंगाबाद शहर हे आशिया खंडातच नव्हे तर जगतात औद्योगिक क्षेत्रात किती उंचीवरील अन् महत्त्वपूर्ण शहर आहे हे दाखवून देत आहे...

नवीन निर्माण होणारा रोजगार लक्षात घेता आगामी काळात येथे मोठ्या प्रमाणावर रहिवासी प्रकल्पाची गरज भासणार आहे.

अलिकडच्या काळात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेले रहिवासी प्रकल्प 'रिअल इस्टेट'च्या जगतात सुगीचे दिवस आणु बघत आहे,एकुण शहराचा विकास औद्योगिक क्षेत्राच्या आधारावर भरभराटीस येऊ बघत आहे...

सोबतच काही अंशी का होईना परंतु आता नव्याने काही नवीन प्रकल्प उभे राहण्यासाठी स्थानिक उद्योजक असो किंवा परदेशी उद्योग विश्वातून उद्योजक भारत देशात आपले प्रकल्प या ठिकाणी स्थायिक करण्याचा प्रयत्न करत आहे,औरंगाबाद शहरात आपले पावलं रोवू बघत आहे.दिवसेंदिवस आधुनिक टेक्नॉलॉजी मुळे होणारे बदल स्वीकारत शहरात एमआयडीसी मधील प्रकल्पा अंतर्गत औद्योगिकविश्वात होणाऱ्या घडामोडी हे सर्व बघण्यासारखे आहे... औरंगाबाद शहर फक्त ऑटोमोबाईल इंडस्ट्रीयल एरियासाठी मर्यादित न राहता,फार्मा इंडस्ट्रीमध्ये सुद्धा आपलं स्वतंत्र नाव उभे करत आहे. आज देशा-परदेशातील नामांकित फार्मा ५०-६० कंपन्या या औरंगाबाद शहराला लागून असलेल्या औद्योगिक वसाहतीत आपले प्लांटस उभे करत आहे काही वर्षानूवर्ष चालू आहेत. एकीकडे शहरात इतक्या मोठ्या प्रमाणात ऑटोमोबाईल इंडस्ट्रीयल क्षेत्रात आपले मुळं रूजवून आहे तर सोबतच,फार्मा क्षेत्रात चालू असलेल्या घडामोडी बघता फार्मा क्षेत्रातील औरंगाबाद शहरालगत औद्योगिक वसाहतीत असलेल्या कंपन्या बघता ऑटोमोबाईल क्षेत्रानंतर सर्वाधिक कंपन्या असलेलं फार्मा क्षेत्र ठरत आहे. आजमितीला या कंपन्यांच्या माध्यमातुन खूप मोठ्या प्रमाणात रोजगार हा औरंगाबाद शहर अन् जवळपास असलेल्या छोट्या शहरातील नागरिकांना उपलब्ध झालेला आहे. औरंगाबाद शहरालगत असलेल्या औद्योगिक वसाहतीत अनेक जगप्रसिद्ध नामांकित कंपन्यांनी आपलं प्रोडक्शन हाऊस उभारले आहे,ज्या माध्यमातून




सर्व विश्वात मेडीसिन पुरवण्याचे कार्य या कंपन्या करत आहेत. कोरोना ज्यावेळी मोठ्या प्रमाणात पसरलेला होता,त्यावेळी रात्रंदिवस या कंपन्यानी प्रोडक्शन चालू ठेवून आपली कामगिरी पूर्ण केली आहे अन् खूप मदत प्रशासनाला केली आहे .!

औरंगाबाद शहरालगत असलेल्या पाच औद्योगिक वसाहतीत आज घडीला अनेक देश विदेशी फार्मा कंपन्यांनी आपले पाय रोवले आहे.यातील काही कंपन्यानी जवळ जवळ दोन दशकांपूर्वी येथील औद्योगिक वसाहतीत आपले प्रोडक्शन हाऊस चालू केले आहे..! यात खालील फार्मा कंपन्या मोठ्या प्रमाणात रोजगार उपलबध करून देत आहेत..!

1) WOCKHARDT PHARMA,WOCKHARDT RESEARCH CENTER.
2) LUPIN LIMITED.
3) MAYLAN LABORATORIES.
4) GLENMARK PHARMA.
5) HARMAN FINOCHEM LIMITED.
6) AJANTA PHARMA.
7) SUN PHARMA LIMITED.
8) ATRA PHARMACEUTICAL COMPANY.
9) MIDAS CARE PHARMACEUTICAL.

अश्या अन् अनेक छोट्या मोठ्या विविध कंपन्या या ठिकाणी कार्यरत आहेत...

औरंगाबादसह मराठवाड्यासाठी भूषण असलेल्या दिल्ली मुंबई इंडस्ट्रिअल कॉरिडॉरच्या (डीएमआयसी) औरंगाबाद इंडस्ट्रिअल सिटी (ऑरिक) शेंद्रा टप्प्यात साधारण जानेवारी २०२१ मध्ये आणखी पाच नवीन कंपन्यांची भर पडली आहे.या कंपन्यांना भूखंडांचे वितरण नुकतेच करण्यात आली.या कंपन्यांमधून १६० कोटींची गुंतवणूक झाली असून जवळजवळ २५० जणांना रोजगार मिळणार आहे. दरम्यान,COVID-19 परिस्थितीनंतर प्रथमच 'ऑरिक' व्यवस्थापनाकडे मागणी केलेल्या उद्योगांपैकी पाच उद्योगांना प्लॉट हस्तांतरित करण्यात आले.यामध्ये "SINDHIYA PHARMA",यासह औषधनिर्मितीतील आणखी एक कंपनी,लिक्विड ऑक्सिजनसह ऑक्सिजन प्रॉडक्टस् तयार करणारी "INOX AIR PRODUCTS PRIVATE LIMITED",फूड प्रोसेसिंगमधील एक आणि सॅनिटरी नॅपकिन बनविणाऱ्या एका उद्योगाचा समावेश आहे..! त्यामुळे फार्मा विश्वातसुद्धा औरंगाबाद शहर आपले स्थान निर्माण करत आहे..! त्यानंतर २०२२ मध्येसुद्धा काही दिवसांपूर्वी दिल्ली- मुंबई औद्योगिक पट्ट्यातील बिडकीन येथील औद्योगिक वसाहतीमध्ये दोन कंपन्यांनी १५२० कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून त्यांना ३११ एकर जमीन उपलब्ध करून देण्यात आली आहे. "COSMOFILM" व "PIRAMAL PHARMA PRIVATE LIMITED." असे या दोन कंपन्यांची नावे असून या दोन्ही कंपन्या सुरू झाल्यानंतर २ हजार ७०० जणांची प्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल असा औद्योगिक विभागातील अधिकाऱ्यांचा अंदाज आहे. औरंगाबाद इंडस्ट्रीयल सिटीमध्ये (ऑरिक) शेंद्रा येथील ३३३ भूखंड उद्योगांना देण्यात आले असून येथून उत्पादनही सुरू झाले आहे. मात्र, बिडकीन येथील क्षेत्रात अद्याप गुंतवणूक झाली नव्हती. दोन कंपन्यांनी आता गुंतवणूक केली आहे. कॉस्मोफिल्मसाठी १७३ एकर जमीन देण्यात आली असून ही कंपनी १०२० कोटी रुपयांची तर पिरामल फार्मा या कंपनीस १३८ एकर जागेत ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. कॉस्मोफिल्मचा प्रकल्प २०२४ पर्यंत सुरू होईल तर पिरामलचे उत्पादन २०२३ मध्ये सुरू होईल असे सांगितले जात आहे. सोबतीने औद्योगिक वसाहतीत निर्माण झालेला कच्चा माल असो किंवा तयार झालेली पार्टस यांना दुसऱ्या राज्यात,देश विदेशात निर्यात करण्यासाठी किंवा तेथील काही गोष्टी कंपन्यांत ज्या महत्त्वाच्या आहेत त्यांना आयात करण्यासाठी दळणवळणाची साधने निर्माण झालेली आहे..! औरंगाबाद शहराच्या जवळून जाणारा समृध्दी महामार्ग असो किंवा एन एज २११ महामार्ग, एन एज ५२ धुळे - सोलापूर महामार्ग त्यानंतर शहरातून अनेक पर्यायी मार्ग यामुळे हा प्रवास सहज झाला आहे, त्यानंतर आंतरराष्ट्रीय एअरपोर्टच्या माध्यमातून सुरू असलेली "कार्गो सेवा" आणि त्या माध्यमातून होणारे दळणवळण. औरंगाबाद शहर ऑरीक सिटीच्या माध्यमातून एकीकडे देश-जगतातील उद्योगविश्वात महत्त्वाचे शहर म्हणून नावारूपास येण्याचा प्रयत्न करत आहे.ऑरीक सिटीच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध झालेली आहे,औरंगाबाद शहराच्या भूमीवर येणारे विविध मोठाले देश विदेशातील प्रकल्प यामुळे भविष्यात औरंगाबाद शहराचे नाव उद्योग विश्वात देशातीलच नव्हे तर जगातील महत्वाचे शहर म्हणून नावारूपास येणारे शहर ठरणार आहे,त्यामुळे नक्कीच पुढील काळ हा औरंगाबाद येथील नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण असणार आहे..!










# जगातील पाच शहरांमध्ये औरंगाबादचे नाव

आधुनिक केसरी

महाराष्ट्राचं मोल वाढलं, जगातल्या पाच शहरांमध्ये औरंगाबादचं नाव नोंदवलं, जगातील इतर शहरांमध्ये चीनमधील बीजिंग आणि टियांजिन, दक्षिण कोरियातील सोल, अमेरिकेतील बोस्टन आणि जर्मनीतील ड्रेसडेन यांचा समावेश आहे. ही शहरे ग्लोबल इनोव्हेटिव्ह मॅन्युफॅक्चरिंगचा गड मानली गेली आहेत. एका प्रसिद्ध इटालियन मासिकाने आपल्या सर्वेक्षणात जगातील पहिल्या पाच आंतरराष्ट्रीय शहरांमध्ये महाराष्ट्रातील औरंगाबादला स्थान दिले आहे . या यादीत नाव नोंदवणारे औरंगाबाद व्यतिरिक्त महाराष्ट्रातील दुसरे शहर देखील आहे. ते शहर दुसरे कोणी नसून भारताची आर्थिक राजधानी मुंबई आहे . जगातील इतर शहरांमध्ये चीनमधील बीजिंग आणि टियांजिन, दक्षिण कोरियातील सोल, अमेरिकेतील बोस्टन आणि जर्मनीतील ड्रेसडेन यांचा समावेश आहे. गुंतवणूक आणि वाढीच्या क्षमतेच्या जोरावर औरंगाबादची ओळख झपाट्याने विकसित होणारे शहर म्हणून झाली आहे.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क 9561594306




'GLI STATI GENERALI-INNOVAZIONE-MACROECONOMIA' नावाच्या या प्रसिद्ध मासिकाने औरंगाबाद आणि मुंबईसह वरील शहरांना ग्लोबल इनोव्हेटिव्ह मॅन्युफॅक्चरिंगचा गड मानला आहे. मासिकानुसार ही शहरे बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी सर्वात मजबूत क्षेत्र आहेत. अनेक आंतरराष्ट्रीय स्तरावरील औद्योगिक समूहांचे गड असे त्यांचे वर्णन केले जाते. ही शहरे आंतरराष्ट्रीय दर्जाची प्रयोगशाळा आणि कारखाने आणि विद्यापीठे आणि संशोधन केंद्रे यांनी संपन्न आहेत असे म्हटले जाते. मुंबई-औरंगाबाद हे माहिती आणि संगणक तंत्रज्ञान (ICT), कापड, फार्मास्युटिकल आणि मेकॅनिकलसाठी सर्वात योग्य उत्पादन युनिटचे केंद्र म्हणून वर्णन केले गेले आहे. टाटा समूह, रिलायन्स इंडस्ट्रीज, हिंदुस्थान युनिलिव्हर आणि मोठ्या बँका येथे उपस्थित असल्याने मुंबई-औरंगाबादची उपयुक्तताही मोजली गेली आहे. औरंगाबादला उत्पादन क्षेत्राचा राजा मानला जातो. उत्पादन क्षेत्रात औरंगाबाद अव्वल ठरले आहे. औरंगाबादची लोकसंख्या केवळ आठ लाख असल्याचे नियतकालिकात म्हटले आहे. असे असूनही ऑटोमोटिव्ह, अभियांत्रिकी, फार्मास्युटिकल, प्लास्टिक आणि रसायने या क्षेत्रात ते खूप पुढे आहे. येथून मोठ्या प्रमाणात तयार माल देश-विदेशात निर्यात केला जातो. सीमेन्स, बीएमडब्ल्यू, स्कोडा यांसारख्या मोठ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे औरंगाबादच्या विस्तीर्ण औद्योगिक भागात प्लांट आहेत. उद्योगांबरोबरच औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची उपस्थिती हेही त्याच्या विकासाचे प्रमुख कारण असल्याचे नमूद केले आहे. हे भारतातील सर्वात प्रसिद्ध विद्यापीठांपैकी एक आहे. देशभरातून येथे येणाऱ्या विद्यार्थी आणि संशोधकांमुळे हे शहर आगामी काळात आणखी विकसित होईल, असा दावा मासिकाने केला आहे. येथे संशोधन आणि व्यवसाय करण्यासाठी नवनवीन टॅलेंट आल्याने औरंगाबादचे मानांकन भविष्यात अधिक चांगले होईल, असे दिसून आले आहे.

एकट्या औरंगाबाद औद्योगिक वसाहतीत अवघ्या काही दिवसांत ४५००हून अधिक उद्योग सुरू झाले आणि त्याठिकाणी अडीच लाख कामगार कार्यरत झाले. ऑटोमोबाइल, इंजिनीअरिंग, फार्मा, कृषीपूरक, मद्यनिर्मिती यासह अन्य क्षेत्रातील उत्पादन औरंगाबादेत होते. जगाच्या नकाशावर औरंगाबाद औद्योगिक नगरी मान्यता पावलेली आहे. न्यू नॉर्मलच्या दुसऱ्या टप्प्यात ९० टक्के उद्योग पूर्ण क्षमतेने सुरू झाले. निर्यातीत औरंगाबादचा डंका मध्यंतरी राष्ट्रीय पातळीवरील एका सर्वेक्षणातदेखील देशातील महत्त्वाच्या निर्यातक्षम जिल्ह्यांत औरंगाबादचा क्रमांक लागला होता. औरंगाबादमधून अभियांत्रिकी वस्तू, औषधी आणि फार्मास्युटिकल्स, प्लास्टिक आणि लिनोलियम, सेंद्रीय आणि अजैविक रसायनांची मोठ्या प्रमाणावर निर्यात होते.

औरांबादमधील जालना शहर हे पूर्वीपासूनच व्यापार, उद्योगांसाठी ओळखले जाते. जालना येथील स्टील महाराष्ट्रासह देशात आणि जगभर निर्यात केले जाते. या स्टील उद्योगामुळे शासनाला कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळतो. जालन्यात डाळ मिल, जिनिंग, तसेच आरमशिनसह लोखंडी कारखाने, बेअरिंग्ज तयार करणारी एनआरबी, मोटारसायकलच्या चेन तयार करणारी एलजीबी या कंपन्यांसह अनेक लघु उद्योग येथे विस्तारले आहेत. पहिला औद्योगिक वसाहतीचा तो पहिला टप्पा म्हणून ओळखला जात असे. त्यानंतर जालना - औरंगाबाद मार्गावर एमआयडीसीचा जवळपास ४०० एकर परिसरावर दुसरा टप्पा १९८० च्या दशकात विकसित केला होता. आज याच टप्प्यात स्टीलसह वर उल्लेखित उद्योग विस्तारले आहेत. जालन्यात ५००एकर जमिनीवर ड्राय पोर्ट उभारल्या जात आहे. जालन्यातील स्टील उद्योगांनी आयात केलेले भंगार सध्या मुंबई पोर्ट ट्रस्ट येथे येते. तेथून हा माल जालन्यापर्यंत आणताना वाहतुकीवर प्रचंड खर्च होतो. हा पोर्ट सुरूझाल्यास कच्चे स्टील तुलनेने कमी खर्चात जालन्यापर्यंत येईल. शेंद्रा पंचतारांकित औद्योगिक वसाहत परिसरात आता डीएमआयसी प्रकल्प येतो आहे. त्यामुळे औरंगाबादच्या उद्योग वाढीस चालना मिळणार आहे. दोन्ही शहरांच्या मध्ये हा पोर्ट झाल्यास जालन्याच्या स्टील उद्योगाला त्याचा लाभ होईलच. शिवाय अडचणीत असलेल्या स्टील उद्योगांच्या वाढीला त्याची मदत होईल.

दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर अंतर्गत ऑरिक सिटी क्षेत्रात उद्योगांसाठी सुनियोजित पायाभूत सुविधा असल्यामुळे आगामी काळात औरंगाबाद शहराचा सर्वांगिण विकास होण्यास मदत होणार आहे व हे शहर औद्योगिकदृष्ट्या देशातील सर्वोत्कृष्ट विकसित शहर म्हणून ओळखले जाणार आहे.
















# आईचा शब्द प्रमाण मानणारा मुलगा म्हणजे शिवाजी महाराज !

संयमाचा परीघ



चित्र : बाबूराव पाटील, भोकर



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : १६

आधुनिक केसरी

**राजे छत्रपती शिवरायांचा तरुणाईला परीचय होणं काळाची गरज आहे.शिवाजी महाराजांबद्दल वस्तुनिष्ठ आकलन व्हावं आणि याही दृष्टीनं महाराजांचं चरित्र समजून घेणं काळाची गरज आहे. महाराजांच्या केवळ रुबाबदार दिसण्यावर तरुणाईनं भाळू नये तर त्यांचं कर्तुत्ववान आयुष्य एकदा दम धरुन वाचावं त्यांच्या कल्पक आयुष्याला मुळातुन समजून घ्यावं ही या लिहिण्यामागची अंतरीक तळमळ आहे. महाराजांनाचं तत्वज्ञान आपण कुठल्या इझममध्ये बांधून त्यांच्या वैश्विकतेला बाधा तर आणंत नाहीत ना, हे ही पहायला हवं. महाराजा म्हणजे केवळ भरजरी वत्रपरीधान नव्हे की केवळ भवानी तलवार आणि रुबाबदार घोडा.महाराजांना आणि एकुणंच महापुरुषांना आपण चौका चौकात उभं करुन आपल्या आस्मिता प्रचंड टोकदार तर करत नाहीत ना, यावरही विचार व्हावा.महापुरुषांची जयंती जरा वैचारिक पातळीवर करता आली तर समाजमन महाराजांच्या शूर वीर जीवन कार्याचा आपल्याला समाजाला आरसा दाखवता येईल...ही या लेखणामागची पवित्र भावना !**

१. आईचा शब्द प्रमाण मानणारा मुलगा म्हणजे शिवाजी महाराज. सगळ्या जाती-धर्मातल्या समवयस्क पोरासोरांचं मैत्रीपूर्ण जिव्हाळ्याचं वर्तुळ म्हणजे शिवाजी महाराज. पौगंढावस्थेला आलेलं आत्मभान, स्वाभीमान म्हणजे शिवाजी महाराज. तारुण्याच्या उंबरठ्याला जाणवलेली अन्याय-अत्याचारांची प्रचंड चीड म्हणजे शिवाजी महाराज.

२. लेकरंहो ! अगदी आजही तुम्हाला सांगायचं झालं शिवरायांचं चरित्र तर हे असंच असेल माझं मत अजूनही... जवानीनं घेतलेली स्वातंत्र्याची शपथ नियोजनपुर्वक पुर्णत्वास नेणारा लढा म्हणजे शिवाजी महाराज. कर्तव्यासाठी जिवाचं रान करणा-या पोरांची एकजूट म्हणजे शिवाजी महाराज.
शिवाजी महाराज म्हणजे केवळ वाघनख्या नव्हेत पोरंहो. केवळ जिरेटोप आणि पिळदार, खाप दाडी-मिशी म्हणजेही नाहीत ना शिवाजी महाराज.
शिवाजी महाराज म्हणजे जड-जवाहर-रत्नडीत माळा नव्हेत. आणि नव्हेच ना कपाळावर केवळ अर्धचंद्राचा टिळा म्हणजे शिवाजी महाराज .
शिवाजी महाराज म्हणजे केवळ भवानी मातेची तळपती तलवार नव्हे.
शिवाजी महाराज म्हणजे शिराळाची घोड्यावरली रपेटही नाही ना पोरंहो.
आणि नाही ना केवळ रुबाबदार शिंहासन म्हणजे शिवाजी महाराज ?

३. शिवाजी महाराज म्हणजे कडेकोट सुरक्षेने आधुनिक अभियांत्रीकीच्या वास्तुशास्त्राला थक्क करणा-या अभेद्य किल्ल्यांची मालिका.
शिवाजी महाराज म्हणजे आपणंच कठोर काटेकोरपणे,आपल्या कर्तव्यापायी जिवाची लावलेली बाजी.
शिवाजी महाराज म्हणजे तमाम लेकीबाळींच्या जगण्याचा नैतिक आदरभाव.
छातीठोकपणे काळजावर मिरवावं असं सन्माननीय सभ्य नाव म्हणजे शिवाजी महाराज.
रयतेच्या सुखा-समाधानाचं पालकत्व घेतलेला वंदनीय महापुरुष म्हणजे शिवाजी महाराज.
कुण्या एका गटा-तटाचं नाव कधीच नव्हतं शिवाजी महाराज लेकरंहो. थोरामोठ्यांचा मान सन्मान म्हणजे शिवाजी महाराज. शिवाजी महाराज नव्हतेच ना केवळ गो-ब्राम्हण प्रतिपालक...
मराठी मुलखातील तमाम रयतेचं छत्रं म्हणजे शिवाजी महाराज !

४. शिवाजी महाराज म्हणजे सूड-कपट नाही लेकरा शिवाजी महाराज म्हणजे निर्भीड निर्भयता.
अन्याय-अत्याचारावर अंकूश म्हणजे शिवाजी महाराज. दबल्या-पिचल्या शेतीचा पालनहार म्हणजे शिवाजी महाराज. शिवाजी महाराज म्हणजे दिवस-रात रयतेच्या कल्याणाचा विचार. शिवाजी महाराज म्हणजे प्रेमळ माणसाचा नितळ निर्मळ कारभार.
बाळा ! स्वबळावर कमावलेली इज्जत म्हणजे शिवाजी महाराज रे !

५. दादागीरी,गुंडगीरीचं दुसरं नाव कसं काय असू शकेल बरं शिवाजी महाराज ? उद्धधटपणा, अहंकाराचं तर कतईंच नव्हतं ना नाव शिवाजी महाराज. विवेकवादी तळमळ म्हणजे शिवाजी महाराज. पुरोगामी चळवळ म्हणजे शिवाजी महाराज. सन्मार्गी,संयमी,सज्जन समाज म्हणजे शिवाजी महाराज. शूरवीर हिमतीचं राज म्हणजे शिवाजी महाराज. थोरामोठ्याचं ऐकणं म्हणजे शिवाजी महाराज. ते सांगतील तसं वागणं म्हणजे शिवाजी महाराज. शिवाजी महाराज म्हणजे कठोर अंधःकार चिरडणारा बहाद्दर. शिवाजी महाराज म्हणजे विरोधी विचारांचाही सन्माननीय विवेकपुर्ण आदर. शिवाजी महाराज म्हणजे आपमतलबी कारभा नव्हे, लेकरंहो ! शिवाजी महाराज म्हणजे जनकल्याणकारी निस्वार्थी सरकार.
तमाम मुस्लिमांचा तिरस्कारही नव्हे ना शिवाजी महाराज म्हणजे ! शिवाजी महाराज म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुतेनं भारावलेला निःपक्षपाती न्याय !

६. संयमी, सत्कर्मी, सन्मार्गी, सज्जन समाज म्हणजे शिवाजी महाराज. डोंगर द-यात, खेड्या-पाड्यात, वाड्या- वस्त्यात वसलेल्या गोर-गरीब, कष्टाळू समुदायाचा सामुहीक आवाज म्हणजे शिवाजी महाराज. शस्त्र आणि शास्त्र पारांगत प्रतिष्ठा म्हणजे शिवाजी महाराज. कसल्याही शोषणाचं कोणतंही नाव असू शकंत नाही शिवाजी महाराज.
शिवाजी महाराज म्हणजे निर्व्यसनी,निरोगी तरुण. प्रचंडंच विवेकी वर्तनाचं दुसरं नाव म्हणजे शिवाजी महाराज लेका ! साधु-संतांच्या विवेकपूर्ण विचारांनी भरण-पोषण केलेला सुसंवादी महापुरुष म्हणजे... राजे छत्रपती शिवाजी महाराज !



# किल्ले संवर्धनातून महाराष्ट्र माझा कधी गर्जना करणार ?



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**छत्रपती शिवाजी महाराज आणि किल्ले ही आपली अस्मिता असून या अस्मितेला जपण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. आजही महाराष्ट्रातील किल्ल्याची दुरावस्था बिकट झालेली पाहायला मिळत आहे.शिवप्रेमी आणि किल्लेप्रेमींकडून वारंवार यांकडे लक्ष वेधले जात असते.महाराष्ट्रातील किल्ल्यांचे संवर्धन केले पाहिजे.अशी अपेक्षा सुद्धा व्यक्त केली जात असते.किल्ले टिकले पाहिजेत हे तळमळतेने मांडले जात आहे.**

किल्ले हा आपल्या महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा असून हा वारसा टिकवून ठेवण्यासाठी जनतेलाच वारंवार इथे झोपलेल्या सरकार सह प्रशासकीय यंत्रणा आणि पुरातत्व खात्याला सुद्धा सांगावे लागत आहे. यासाठी विविध आंदोलने होत आहेत.परंतु आंदोलनाला यश मिळत नाही.

सरकार, पुरातत्व खाते,लोकप्रतिनिधी,राजकीय पक्ष,नेते मंडळी यांना तर या किल्ल्यांचे काही देणे घेणेच नाही. असेच म्हणावे लागणार आहे.

शिवजयंती दिनी मात्र शिवरायांच्या कार्याचा मोठा जयघोष केला जातो.परंतु ज्या छत्रपतींमुळे ह्या किल्ल्यांचे वैभव आपल्या महाराष्ट्राला पाहायला मिळते. त्याच किल्ल्यांच्या बाबतीत मात्र दुरावस्था दिसून येत आहे. महाराष्ट्रात असे अनेक छोटे मोठे किल्ले आहेत की त्या किल्ल्यांकडे दुर्लक्ष होऊन किल्ले नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

किल्ले जीवित राहावेत म्हणून अनेक शिवप्रेमी व किल्लेप्रेमी संघर्ष करत आहेत. परंतु संघर्षालाच अनेक वर्ष होऊन चालली आहेत.

तरी सुद्धा किल्ले पुनर्जीवीत अवस्थेत आणण्यासाठी प्रयत्न होत नाहीत. आज ना उद्या किल्ले संवर्धना साठी धडपड पाहायला मिळेल.

त्यामुळे आजही अनेकांचे संघर्षावर संघर्ष सुरू आहेत. संघर्षास न्याय मिळेल ही अपेक्षा अजूनही जीवित आहे. किल्ले संवर्धन व्हावे.

किल्ल्यांच्या श्रीमंतीस संवर्धनातून मोठे वैभव प्राप्त व्हावे. ज्या किल्ल्यांनी आपल्याला न्याय मिळवून दिला. त्याच किल्ल्यांना संवर्धनातून न्याय देण्याची वेळ आली आहे. न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या शिवप्रेमींना अजून कितीकाळ संघर्ष करावा लागणार आहे. याची जाणीव आता तरी ठेवायला हवी. किल्ले संवर्धनासाठी ना पुरातत्व खाते झटत आहे. ना इथले सरकार,ना राजकीय नेते, ना प्रशासकीय यंत्रणा काहीच करू शकत नाही. कुणीच प्रयत्न करणार नसेल तर किल्ल्यांचे संवर्धन होणार तरी कसे? हे असेच घडत राहणार असेल तर भविष्यात सुद्धा हे किल्ले शिल्लक राहतील की नाही? असा प्रश्न उपस्थित राहिला आहे. स्वराज्य हे इथल्या किल्ल्यांमध्ये दडलेले आहे. अजूनही त्याचे अस्तित्व आहे. स्वराज्याला आकार देणाऱ्या किल्ल्यांचे अस्तित्व टिकविण्यासाठी नेत्यांनीच प्रयत्न करायला हवेत. केलेल्या घोषणा हवेत सोडून चालणार नाही तर त्या घोषणा पूर्ण करण्याची वेळ आलेली आहे.नेत्यांच्या राजकारणातून अनेक अपेक्षित नसलेले निर्णय घडू शकतात, राजकीय स्वार्थ साधण्यासाठी राजकीय घडामोडी घडत असतात. ईडीची नोटीस, नंतर चौकशी,मग आपोआप कारवाईच थांबत असते. हे सगळं राजकिय दृष्ट्या घडू शकतं तर महाराजांच्या किल्ल्यांचे संरक्षण करण्यासाठी का तत्परता दिसून येत नाही.का महाराजांच्या किल्ल्याचे संवर्धन होऊ शकत नाही?असे अनेक सवाल उपस्थित होत आहेत.किल्ले संवर्धनासाठी शिवप्रेमीकडून वारंवार किल्ले हे चर्चेला पुढे आणले जात असतात. पत्रव्यवहार सुद्धा केलेले असतात.दिवाळी सणा वेळी तर किल्ले स्पर्धा आयोजित केल्या जात असतात. किल्ले स्पर्धेतून विविध किल्ले बनविले जात असतात. किल्ल्यासाठी शिवप्रेमींची असणारी तळमळ अजूनही ना इथल्या यंत्रणा ना व्यवस्था याना दिसत नाही.किल्ल्यास भेट देण्यासाठी अनेक लोक जात असतात.अशावेळी किल्ला स्वच्छतेची मोहीम सुद्धा राबविली पाहिजे. किल्ल्यावर अनेक



मुलं मुली जात असताना तेव्हा किल्ल्यांच्या भिंतीवर स्वतःचीच नाव कोरण्याचा प्रयत्न करत असतात. अशाने आपले किल्ले पुनर्जीवीत अवस्थेत राहणार आहेत.स्वराज्याचे किल्ले टिकवून ठेवणे ही सर्वांची जबाबदारी आहे.ज्या किल्ल्यांची दुरावस्था झालेली आहे.त्या किल्ल्यांकडे लक्ष देणे पुरात्व खात्यासह सरकारची सुद्धा महत्वपूर्ण जबाबदारी आहे.किल्ले हे नुसते हे इतिहासाच्या पुस्तकात शिल्लक न राहता ते प्रत्यक्ष लोकांच्या नजरेसमोर सुद्धा दिसायला हवेत."जय जय महाराष्ट्र माझा" हा किल्यांचे

जतन आणि संवर्धनातून पुढे आणायाला हवा. किल्ल्याबाबत असलेली दुरावस्था आणि इथल्या राजकीय पक्षास थांबविता येत नसेल तर हे त्यांच्या निष्क्रिय आणि दुर्बळ पणाचे लक्षणच म्हणावे लागेल.इथे जे जे राजकीय पक्ष व नेते मंडळी एवढेच नव्हे जे जे लोकप्रतिनिधी ज्या ज्या किल्यांच्या परिसरात कार्यरत आहेत.अशा सर्वांना महाराजांचे नाव घ्यायचे असेल तर त्यांनी महाराजांच्या किल्ल्यांचे संवर्धन केलेच पाहिजे. महाराजांचे नाव घेऊन राजकारण केले जात आहे. परंतु त्यांच्या किल्ल्यांचे संवर्धन होत नसेल तर अशा कोणत्याच पक्षांना आणि नेत्यांना त्यांचे नाव घेण्याचा हक्क उरत नाही.आपला महाराष्ट्र हा संघर्षाने तयार झालेला आहे.अनेकांच्या बलिदान ह्या महाराष्ट्रास लाभलेले आहे. महाराष्ट्राचा गौरव तर व्हायलाच हवा.परंतू ज्या किल्ल्यांनी महाराष्ट्राचे वैभव आहे.ज्या किल्ल्यांनी महाराष्ट्राची छाती अभिमानाने फुगत असते. त्या किल्ल्यांच्या संवर्धना साठी काहीतरी करायलाच हवे.जय जय महाराष्ट्र माझा हा नुसता गाण्या पुरता मर्यादित ठेवून चालणार नाही.तर तो किल्ल्यांचे जतन आणि संवर्धनातून पुढे आणला पाहिजे.किल्यांचा महाराष्ट्र जपून ठेवण्यासाठी कृतिशील कार्याची गर्जना पुढे आली पाहिजे.तरच महाराजांचा आणि महाराजांनी निर्माण केलेल्या महाराष्ट्राचा महाराष्ट्राच्या मातीत गौरव होईल.



# कोकणच्या सुपुत्राने आफ्रिकेत साजरी केली शिवजयंती

## माजी नगरसेवक लियाकत चौघुले यांचे सुपुत्र शरीक चौघुले यांचा विदेशात डंका

आधुनिक केसरी न्यूज

**रत्नागिरी :** कोकणच्या सुपुत्राने आफ्रिकेतील टांझानिया येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा जयंती उत्सव साजरा करून विदेशात देखील छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्याची प्रथा सुरू केली आहे. चिपळूण येथील माजी नगरसेवक स्वर्गीय लियाकत चौघुले यांचे सुपुत्र शरीक चौघुले हे सध्या आफ्रिका देशातील टांझानिया येथे वास्तव्यास असून ते तेथील नगरसेवक देखील आहेत. कोकणच्या या सुपुत्राने महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयंती उत्सव मराठी बांधवांना एकत्रित आणून साजरा केला आहे. आज संपूर्ण देशभरात छत्रपती शिवाजी महाराजांचा जयंती उत्सव धुमधडाक्यात साजरा केला जात असतानाच परदेशातही आपले मराठी बांधव आपल्या राजांचा हा उत्सव साजरा करून जगभरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यगाथेचा प्रसार करताना पाहायला मिळत आहेत. शरीक चौघुले यांनी आफ्रिकेत शिवजयंती उत्सव साजरा केल्याबद्दल गुहागरचे आमदार भास्कर जाधव यांनी शरीक चौघुले यांना व्हिडीओ कॉल करत त्यांचे अभिनंदन केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती परदेशात साजरी करणाऱ्या शरीक चौघुले यांचे आता संपूर्ण कोकणातून कौतुक केले जात आहे.

## आगामी आर्मी अग्निवीर भरतीसाठी फॉर्म भरण्यास प्रारंभ : बाजीराव खांदवे

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** 1 ऑक्टोबर 2002 ते 1 एप्रिल 2006



दरम्यान जन्मतारीख असलेल्या तरुणांना आगामी अग्निविर भरतीमध्ये सहभागी होता येईल, त्यासाठी ऑनलाईन फॉर्म भरणे सुरू झाल्याची माहिती गोदावरी अकॅडमी चे अध्यक्ष बाजीराव खांदवे यांनी दिली.

महाराष्ट्रा सह उत्तरप्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, उत्तराखंड राज्यातील मुले या भरतीसाठी फॉर्म भरू शकतात. JOIN INDIAN ARMY.NIC.IN वरती नोटिफिकेशन जारी करण्यात आले आहे. १६ फेब्रुवारी पासून फॉर्म भरायला सुरुवात झाली आहे. जनरल ड्युटी,टेक्निकल, क्लार्क / स्टोर किपर, ट्रेडसमैन पदासाठी ही भरती प्रक्रिया होत आहे. अग्निविर ट्रेडसमन साठी ८ वी पास,तसेच १० वी पास मुले अर्ज दाखल करू शकतात. अग्निविर जनरल ड्युटी साठी १० वी ला ४५ टक्के मार्क आवश्यक आहेत. अग्निविर टेक्निकल सायन्स ( PCM )ग्रुप सह १२ वी पास किंवा १०वी नंतर आयटीआय किंवा २ किंवा ३ वर्षाचा कोणताही टेक्निकल डिप्लोमा कोर्स केलेला असावा. वरील सर्व पदांसाठी अगोदर शॉर्ट लिस्ट बनवण्यात येईल अगोदर लेखी परीक्षा घेण्यात येईल, त्यानंतर फिजिकल व शेवटी मेडिकल घेण्यात येईल. गरजू विद्यार्थ्यांना गोदावरी अकॅडमी, अहमदनगर येथे भरती पूर्व मार्गदर्शन करण्यात येते. कोणत्याही प्रकारच्या वशील्याशिवाय आर्मीत भरती होण्यासाठी 9822107650 या नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन बाजीराव खांदवे यांनी केले आहे.



# बझम ए बशर समूहाची गझल संध्या रंगली

## 'औरंगाबादकरांनी अनुभवली गझलेची जादू '

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** व्वा,क्या बात है, बहोत खूब, अशी उत्स्फूर्त दाद. शब्द आणि सुरांचा सुरेख मिलाफ दर्दिंच्या गर्दीने तुडुंब भरलेले सभागृह इत्यादी वैशिष्ठ्य असणारी गझल मैफल औरंगाबादकरांनी अनुभवली. 'बझम ए बशर ' 'समुहातर्फे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शायर गीतकार बशर नवाज ह्यांच्या स्मृती प्रीत्यर्थ 'ख्वाब,जिंदगी और मैं' ही हिंदी,ऊर्दू, मराठी गझलांची मैफल महसूल प्रबोधिनी येथे घेण्यात आली. डॉ सोहेल झकीउद्दिन, प्रो.गणेश घुगे,प्रशांत शेळके (प्रशासक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ) ॲड प्रीती. डिग्गीकर, गिरीश जोशी, बापू दासरी,अरविंद पाथरीकर, शमा रोशन करून (दीप प्रज्वलन) करून मैफलीची सुरुवात केली.

पहिल्या सत्रात अहमद औरंगाबादी, अमरसिंह चंदेल, सय्यद इमरान, काझी जावेद ह्यांनी ऊर्दू गझल सादर करून मैफलीत रंगत आणली.त्यानंतर कवितेच्या सत्रात कवयित्री मृणाल देशपांडे ह्यांनी

**'उगीच का नभास या दिलेस**
**कोवळे ऋतू, चकोर चांदण्यां सहित**
**शुभंकरास माळ तू'**

कवी शंतनू देशपांडे ह्यांनी,

**'आलोच शेवटी मधुशालेला**
**साकी नको रिता ठेवूस प्याला'**

ही कविता सादर केली..

कवयित्री, शायरा प्रीती डिग्गीकर ह्यांनी **'तेरे पास एक अजीबसा सुकून मेहसूस होता है, तूझमे ढलना, खो जाना तूझमे ही बडा दिलकश होता है'** ही गझल सादर केली.

कवयित्री दिपाली भाले ह्यांनी

**'सूर्य तुजला रेखाटायचा**
**मी काजवे आहे पाळलेले...**

ही कविता सादर केली. नितीन जेथलिया ह्यांनी ऊर्दू शेर सादर केले तर कवयित्री संध्या फुलपगार-अचिंतलवार ह्यांनी 'मी कशाला कुणाची चाकरी करावी म्हणते, अर्धीच पण हक्काची भाकरी करावी म्हणते' ही गझल सादर करून कवी संमेलनात बहार आणली.

यानंतरच्या सत्रात झालेला गझल मुशायारा युवा गझलकारांनी गाजवला. दीपक हापत ह्यांनी

**'सख्खी, चुलत, मावस, होती,**
**एक वेदना सालस होती ,**
**दृष्टीहीन स्पर्शातुन बघतो**
**त्याची बोटे डोळस होती'**
**ही गझल पेश केली.**

**तर राही औरंगाबादी ह्यांनी**
**'अडकून कोणी जाते, मांज्यात यौवनाच्या, कोणी पतंग होते, मागे पुढे प्रियेच्या'** ही गझल सादर केली.

अविनाश काठवटे ह्यांनी 'निष्कारण या जागरणाला कोप म्हणू का? केवळ डोळे मिटण्याला मी 'झोप' म्हणू का?' ही गझल सादर करून उपस्थितांची वाह वाह मिळवली.तर ऋषभ कुलकर्णी ह्यांनी

जीवना मी तुझे ऐकले बघ किती..
दुःख सारे तुझे मानले बघ किती..
सूर होऊन तू भेट रे विठ्ठला..
गीत ओठात ह्या थांबले बघ किती..

ही बहारदार गझल सादर केली.

हर्षल पवार ह्यांनी **'कुणाला तेल आवडते कुणाला तूप आवडते,** तिचे ठाऊक नाही पण मला ती खूप आवडते' ही गझल सादर करून उपस्थितांच्या मनाचा ठाव घेतला.

त्यानंतर गिरीश जोशी ,रमेश ठोंबरे,बापू दासरी,प्रथमेश गिरीधारी ह्यांनी समारोपीय मुशायरा खूप उंचीवर नेला . गझलकार रमेश ठोंबरे ह्यांनी

**'काय समजून केलास गांधी उभा**
**सत्य म्हणजे तुला खेळणे वाटते ?'**

ही गझल सादर केली. त्यानंतर

'जायचे आहेच तर सांगून जा
एकदा मागे तरी पाहून जा..
एक श्वापद श्वापदाशी बोलले
भेटला माणूस तर लांबून जा'

ह्या गिरीश जोशी (गझलगिरीश)ह्यांच्या गझलेने रसिकांची खास दाद मिळवली.

ज्येष्ठ गझलकार बापू दासरी ह्यांनी 'पतंग होतो अजून असतो उंच उडालो काय करू पण,चक्री,दोरा तिच्याच हाती'. अशी गझल सादर केली..सुप्रसिद्ध युवा शायर गझलकार प्रथमेश गिरीधारी ह्यांनी त्यांच्या दिलखेचक शैलीने मुशायरा कळसाला नेला. त्यांनी सादर केलेल्या

'कई इम्कान इक मानी से निकले
कोई तो शेर आसानी से निकले,
सुकूँ पाने गए थे दुनिया से घर
के फिर घर से परेशानी से निकले'

ह्या गझलेला रसिकांची विशेष दाद मिळाली.. यानंतर झालेल्या गझल गायन मैफलीत सुप्रसिद्ध गायक,संगीतकार प्रा.गजानन केचे ह्यांनी 'क्या तुटा है अंदर अंदर' ही गझल गाऊन वातावरण गझलमय केले.युवा गायिका युगंधरा केचे हिने गिरीश जोशी ह्यांची ' डोंगर,नद्या नि झाडे झुलतात सांजवेळी ' ही गझल तिच्या खास शैलीत सादर करून उपस्थितांची प्रचंड दाद मिळवली. सुप्रसिद्ध गायक राजेंद्र वैराळ ह्यांनी 'फासले ऐसे भी होंगे' ही गझल सादर करून रसिकांची मने जिंकली तर **'मैफिल मै बार बार'** ही गझल गाऊन आरोही वैराळ हिने रसिकांची दाद मिळवली .समारोपीय सत्रात सुप्रसिद्ध संगीतकार,गायक अतुल दिवे ह्यांनी गझलकार दिलीप पांढरपट्टे ह्यांची ' ये मत कहना रुसवा हम है,तेरे भी चर्चे क्या कम है ' तसेच बशर नवाज साहेबांची ' जब छाई घटा, लहराई धनक,एक हुस्न मुकंमल याद आया ' ही गझल सादर केली त्यानंतर गझलकार गिरीश जोशी ह्यांची ' सांजवेळी सुगंधी कहर पाहिजे,मोगऱ्याची जगाला कदर पाहिजे ' ही भैरवी रागातील गझल त्यांच्या दिलखेचक गायकीने फुलवली.

# जवाब दो आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हा : संदीप मानकर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्र राज्यांतील सकल मातंग समाजाच्या वतीने शासनदरबारी गेल्या 50 वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विविध मागण्यांसाठी मुंबई येथील आझाद मैदानावर दि.22 फेब्रुवारी रोजी "जवाब दो आंदोलन" होत असून या ऐतिहासिक आंदोलनात मातंग समाजातील विविध राजकीय पक्षांतील पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे नेते, कार्यकर्ते समाजबांधव आणि भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन समाजाला प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी एकत्रित यावे असे आवाहन "मातंग एकता आंदोलन" या राज्यव्यापी सामाजिक संघटनेचे संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्हाध्यक्ष संदीप मानकर यांनी केले आहे.

जवाब दो आंदोलन हे कुठल्याही ठराविक राजकीय पक्षाच्या विरोधात नसून गेल्या कित्येक वर्षांपासून शासनाकडे आपल्या प्रलंबित मागण्या मान्य करण्यासाठी मातंग समाज हा प्रयत्न करीत आहे. विविध मागण्या घेऊन समाजाच्या वतीने आतापर्यंत अनेक मोर्चे, आंदोलने, उपोषणे झाली. परंतु दुर्देव असे की? या काळांत सर्वच राजकीय पक्षाची सरकारे येऊन गेली परंतु मातंग समाजाच्या रास्त मागण्यांकडे कुठल्याही राजकीय पक्षाने सकारात्मक भावनेने बघतांना आजपर्यंत दिसून आले नाही. म्हणून आता मातंग समाज हा एकवटला असून मुंबईतील आझाद मैदानावर ता.22 रोजी होणाऱ्या होणाऱ्या ऐतिहासिक "जवाब दो आंदोलनातून' विद्यमान सरकारला प्रलंबित मागण्या मान्य करण्यासाठी संयमाने आणि शिस्तीने मागणी करणार आहे. शासनाने गांभीर्याने बघून समाजाला उचित न्याय द्यावा अशी मागणी मातंग एकता आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे माजी गृहराज्यमंत्री रमेश दादा बागवे यांनी शासनाकडे केली आहे. अनुसूचित जातीचे अ,ब,क,आणि ड नुसार आरक्षण वर्गीकरण करून लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण द्यावे. बार्टीच्या धर्तीवर स्वतंत्र अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यांत यावी. क्रांतिवीर लहुजी साळवे व मातंग समाज अभ्यास आयोगांतील सर्व शिफारशींची तात्काळ अंमलबजावणी करण्यांत यावी. साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातील बंद केलेल्या योजना तात्काळ सुरु करण्यांत याव्यात आदी मागण्या घेऊन मातंग समाजाचे "जवाब दो आंदोलन" 22 रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर धडकणार असून मोठ्या संख्येने सहभाग नोंदविण्याचे आवाहन पत्रकार तथा मातंग एकता आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष संदीप मानकर यांनी केले.





# पालकमंत्र्यांच्या हस्ते वैद्यकीय उपकरण व मोबाईल क्लिनिकचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**उस्मानाबाद :** आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजी सावंत यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त जिल्हा सामान्य रुग्णालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे भेट देऊन सी.एस.आर अंतर्गत प्राप्त वैद्यकीय साहित्य, उपरकणे या बरोबर मधु मेह उच्च रक्तदाब, फिट्स, मेनोपॉझ (रजो निवृत्ती) संदर्भातील क्लिनिकचे उदघाटन केले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.राजाभाऊ गलांडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन बोडके,शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.उज्वला गवळी आदी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री यांनी मोबाईल मेडिकल क्लिनिकच्या व्हॅनला हिरवी झेंडी दाखवत त्याचे लोकार्पण केले.तत्पूर्वी डॉ.सावंत यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सोयी सुविधांची सखोल पाहणी केली, यावेळी येथील डॉक्टर्स परिचारिका व इतर कर्मचाऱ्यांशी चर्चा करून त्यांच्या कामकाजाबाबत माहिती घेत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि उपस्थित अधिकाऱ्यांना या अनुषंगाने आवश्यक त्या सूचना केल्या.

# अजिंठ्याच्या त्या अल्पवयीन पीडित मुलीला न्यायासाठी सहकार्य करणार

## बाल हक्क आयोगाच्या सदस्या प्रज्ञाताई खोसरे

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** अजिंठा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सारोळा येथील अल्पवयीन पीडित मुलीवर अत्याचार प्रकरणी पोलीसांकडून अरोपीला अभय मिळत असल्याने पत्रकारांनी दिलेल्या निवेदनानंतर महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोगाच्या मराठवाडा सदस्य प्रज्ञाताई खोसरे यांनी बालगृह येथे जाऊन पीडित मुलीची भेट घेत तिच्यासोबत घडलेल्या सर्व प्रकरणाची माहिती घेऊन पिढीतेला न्याय मिळावा त्यासाठी पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे.

सारोळा येथील अल्पवयीन मुलीवर 71 वर्षीय व्यक्ती मागीलचार ते पाच वर्षापासून आईच्या मदतीने वारंवार अत्याचार करीत होता.वारंवार होत असलेल्या अत्याचाराला कंटाळून पिढीचा प्रियकर सोबत निघून गेली होती. आईने मुलगी हरवल्याची तक्रार अजिंठा पोलिसांनी दाखल केल्यावर पोलिसांनी पिढीचा व प्रियकर आला मध्यप्रदेशातून अजिंठा येथे आणले तेव्हा पीडित येणे तिच्यासोबत अनेक वर्षापासून सुरू असलेल्या अत्याचार विषयी पोलिसा समक्ष जबाब नोंदवला तेव्हा परिसरात एकच घर उडाली होती. तेव्हापासून 71 वर्षीय आरोपी सलीम मलिक आठ ते दहा दिवस पोलिसांना चकमा देत मुलाच्या मदतीने व पोलिसांच्या सहकार्याने फरार होता. पोलिसांनी त्याला शिर्डी येथून अटक केल्यावर आरोपी सलीम मलिक ओझर याच्यावर पोस्को कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता पण पोलिसांनी आरोपी सोबत हात मिळवणे करून कायद्याच्या आरोपी सापडू नये म्हणून पण वाटा निर्माण केल्या होत्या त्यामुळे आरोपीला पंधरा दिवसात जामीन मिळाला आहे. या प्रकरणी पिडीत अल्पवयीन तरुणीला न्याय मिळावा व अजिंठा पोलीसांच्या चुकीच्या तपासाची चौकशी व्हावी म्हणून पत्रकार दादासाहेब काळे व पत्रकार सुनिल वैद्य यांनी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पोलीस महासंचालक, महिला आयोगाच्या रुपालीताई चाकणकर यांच्या सह बाल हक्क सरंक्षण समिती कडे लेखी तक्रार केली होती .याची दखल घेत बाल हक्क आयोग, महिला आयोग यांनी घेतल्या नंतर आयोगाच्या प्रज्ञाताई खोसरे यांनी पीडित मुलीची भेट घेत आरोपीचा बचाव करणाऱ्या पोलीसावर तात्काळ कारवाई करण्यात यावी व पीडित मुलीला न्याय मिळावा यासाठी पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया यांना सांगितले आहे. तेव्हा पोलीस अधीक्षक यांनी बाल हक्क आयोग सदस्या प्रज्ञाताई खोसरे यांना भेटी दरम्यान सांगितले आहे की संबंधित ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित विसपुते यांची मुख्यालय बदली करण्यात आली आहे व पूर्ण पोलीस अधिकारी कर्मचारी यांची चौकशी सुरू आहे.




# कैलास विद्यालय बोडखा येथे शिवजयंती उत्साहाने साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** कैलास विद्यालय बोडखा येथे शिवजयंती मोठ्या उत्साहाने साजरी खुलताबाद तालुका बोडखा येथील कैलास विद्यालय बोडखा येथे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या वेळी बोडखा येथील मुख्याध्यापक कैलास ससे पोलीस पाटील रायभान सोनवणे माजी पोलीस पाटील बाळकृष्ण लोंढे कोळगंडे सर ठोंबरे सर शिंदे सर मिरासे सर सोनवणे सर परदेसी मामा सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

# जबाब दो आंदोलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : ॲड. नितीन पोळ

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** बाबासाहेब आंबेडकर रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (बार्टी)ची सखोल चौकशी करून योजनांचे समन्याय प्रमाणात वितरण करण्यासाठी व अनुसूचित जाती आरक्षणाचे वर्गीकरण करावे, या प्रमुख मागणी साठी मातंग समाजाच्या राज्यव्यापी जबाब दो आंदोलनाचे आयोजन केले असून या आंदोलनात राज्यातील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने हजर राहावे, असे आवाहन लोक स्वराज्य आंदोलनाचे प्रदेश अध्यक्ष ॲड.नितीन पोळ यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. आपल्या पत्रकात पोळ पुढे म्हणाले की महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जाती समूहामध्ये ५९ जातीचा समावेश करण्यात आलेला असून या जातीच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रगतीसाठी १३% आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे मात्र स्वातंत्र्याची ७५ वर्षे झाली तरी या जात समूहातील मांग, मातंग, मांग गारुडी, ढोर,डक्कलवार, बुरुड, मेहतर आदी जातीपर्यंत आजपर्यंत आरक्षणाचा लाभ मिळालेला नाही.



# वंचित बहुजन आघाडीतर्फे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथे रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली यावेळी वंचित बहुजन आघाडीचे फुलंब्री शहराचे शहर अध्यक्ष साजेद शेख ऊर्फ गुड्डू भाई , जनसेवा फाउंडेशन अध्यक्ष शाकेर भाई पटेल, पँथर रंगा भाऊ भूईगड, वंचीत बहुजन आघाडी चे फुलंब्री शहर महासचिव जमाल शेख, वंचीत बहुजन युवा आघाडीचे फुलंब्री तालुका महासचिव विनोद कसारे , सामाजिक कार्यकर्ते अमोल भाऊ माहोरे पा. , सुशांत भाऊ जाधव पा. , किशोर भाऊ सोटम पा. , सुनील भाऊ जाधव पा. , सागर शेजवळ, समीर शेख उपस्थित होते.

Mr. Sunil Patil
Govt. Authorised
SUNIKA
An ISO 9001:2015 Company
Mob.: 9881430555
8766439662
PRERANA ELECTRONICS
Mfg. of All Types of Weighbridge, Weighing Scale & Weighing Automotion
Address : Gut No. 12, Plot No. 9-E, Dhule - Solapur Highway, Opp. Tanwani English School, Aurangabad - 431 136.
Branch : S. P. Enterprises, Shop No. 4, Moti Karanja Chowk, Shahaganj, Aurangabad. Mob.: 8055143555, Email : prerana.electronics@gmail.com



# टाकळी कोलते येथे महारुद्र स्वाहाकार यज्ञ महोत्सव व नामसंकीर्तन सोहळा

आधुनिक केसरी न्यूज





**पीरबावडा :** फुलंब्री तालुक्यातील श्री चैतन्य महादेव मंदीर संस्थान टाकळी कोलते येथे श्री श्री एकादश कुंडात्मक, श्री पितृयाग तथा विष्णुयाग महारूद्र स्वाहाकार यज्ञ महोत्सव या सोहळ्यास १७ फेब्रुवारी पासुन प्रारंभ झाला .असून या सोहळ्याची २४ फेब्रुवार शुक्रवार दुपारी काल्याच्या किर्तनानंतर महा प्रसादाने सांगता होणार आहे. राजुर फुलंब्री रोडवर असलेल्या टाकळी कोलते ता फुलंब्री येथेश्री श्री एकादश कुंडात्मक, श्री पितृयाग तथा विष्णुयाग महारूद्र स्वाहाकार यज्ञ महोत्सव या सोहळ्यास १७ फेब्रुवारीपासून प्रारंभ झाला.

यात महाविष्णुयाग यज्ञ प्रारंभ २१ फेब्रुवारी रोजी प्रारंभ होत असून पुर्णाहुती २३ फेब्रुवारी रोजी होणार आहे. यात दैनदिन कार्यक्रमात पहाटे ४ ते ६ काकडा भजन, ७ ते ९ ज्ञानेश्वरी व्यासपिठ, ८ ते १२ होम हवन यज्ञ महापुजा , १२:३० ते ३:३० शिवपुराण कथा, ५ ते ६ हरिपाठ , ६:३० ते ७:३० प्रवचन रात्री ८ ते १० हरिकिर्तन व जागर असणार आहे . दररोज प्रवचनासाठी दि. १७ फेब्रुवारी रोजी डॉ प पु भगवान बाबा आनंदगडकर ' १८ फेब्रुवारी रोजी प पु स्वामी विशुध्दांनंद तिर्थ १९ फेब्रुवारी रोजी महामंडलेश्वर जनार्धन हरी महाराज फैजपुर, २० फेब्रुवारी रोजी प पु धनराज महाराज अंजाळेकर, २१ फेब्रुवारी रोजी प पु ओम रामेश्वरजी महाराज, २२ फेब्रुवारी रोजी श्री श्री १००८ प पु परमानंद गिरी महाराज भांगसी गड , २३ फेब्रुवारी रोजी श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शिवगिरी महाराज निफाड नाशिक, २४ फेब्रुवारी रोजी श्री श्री १००८ महामंडलेश्वर दयानंद महाराज श्री क्षेत्र शेलगाव व श्री संत अशोक गिरी महाराज वडोद वाडी यांचे दैनदिन प्रवचन होणार आहे तर रविवार १९ फेब्रु रोजी ह. भ.प. श्री संग्राम बापु महाराज भंडारे देवाची आळंदी यांचे किर्तन झाले तर २० फेब्रु रोजी ह भ प विशाल महाराज खोले मुक्ताईनगर, २१ फेब्रु रोजी ह भ प शिवा महाराज बावस्कर, २२ फेब्रु रोजी ह भ प प्रकाश महाराज साठे बीड, २३ फेब्रुवारी रोजी ह भ प पुरुषोत्तम महाराज पाटील बुलढाणा, २४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते १२ काल्याचे किर्तन ह. भ. प. अक्रुर महाराज साखरे गेवराई बीड यांची किर्तन सेवा रहाणार आहे ' दररोज दुपारी शिवपुराण कथा प्रवक्ते नामदेव महाराज लबडे पंढरपुरकर यांच्या मधुर वाणीतुन शिवपुराण कथा होत आहे. तर ज्ञानेश्वरी पारायण व्यासपिठ ह भ प प्रभाकर महाराज फरकाडे हे सांभाळत आहे.

## आशा डांगे यांची भारत - नेपाळ विश्व साहित्य संमेलनासाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** भारत आणि नेपाळ यांच्यातील साहित्यिक मैत्रीचा पूल बांधणारे आणि बहुभाषिक प्रतिनिधींना सोबत घेऊन संपन्न होणारे साहित्य संमेलन काठमांडू शहरात भारतीय दूतावासामार्फत होणार आहे. या संमेलनासाठी अकरा भाषेतील प्रतिनिधी निमंत्रित आहेत. दोन्ही देशांच्या भाषेचा आदान - प्रदान सोहळा मोठ्या दिमाखात व्हावा या उद्देशाने हे पाऊल उचलण्यात येत आहे. संमेलन २१ तारखेला काठमांडू शहरात संपन्न होईल या संमेलनाने बहुभाषिक साहित्यिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या दोन्ही देशातील प्रतिनिधींच्या विचारांची वैचारिक देवाण-घेवाण आयोजित केली आहे. यावेळी मराठी, हिंदी, इंग्लिश, नेपाळी, अवधी, भोजपुरी, बांग्ला, उर्दू, संस्कृत इ . अकरा भाषेतील ३० निमंत्रित कवी सहभागी होत आहेत. भारतातून डॉ. उर्मिला चाकूरकर पैठण, मनोज पाठक बुलढाणा, प्रा. डॉ. विलास पाटील परभणी, डॉ .ज्योती कदम नांदेड, आशा डांगे औरंगाबाद, डॉ. शुभा लोंढे पुणे ,डॉ . प्रीती शिंदे -पाटील कोल्हापूर, अनुजा पाटील तासगाव, चंद्रशेखर पाटील सांगली, डॉ .स्मिता पाटील सोलापूर, दिनकर जोशी बीड, संध्या धाटे अंबाजोगाई हे सहभागी होत आहेत. अक्षरयात्री प्रतिष्ठान विटा भारत आणि राजदूतावास काठमांडू नेपाळ यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाचे औचित्य साधून अक्षरयात्रीचे २५ वे रौप्य महोत्सवी साहित्य संमेलन नेपाळच्या पवित्र भूमीत विश्व संमेलन ज्ञानेश्वर मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली साजरे होत आहे.

## महापुरुषांना बंदिस्त करू नका : ह.भ.प. प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये



आधुनिक केसरी न्यूज

**सोनपेठ :** तालुक्यातील शेळगाव (महाविष्णू) येथील अखंड हरिनाम सप्ताहात शिवजयंतीदिनी जायभाये महाराज बोलत होते. मागील अनेक वर्षांपासून शेळगाव महाविष्णू येथे सर्व जाती-धर्मातील युवकांच्या पुढाकाराने आणि बुजूर्गांच्या मार्गदर्शनाखाली डोंगरावरील श्री सोमेश्वर जागृत संस्थानच्या परिसरात अखंड हरिनाम सप्ताह संपन्न होत आहे. यावर्षी सहाव्या दिवसाची किर्तनसेवा शिवजयंतीच्या दिवशी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शिवव्याख्याते, कवी, प्रबोधनकार ह.भ.प.प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांची संपन्न झाली. "जिंकावा संसार I तेणे नावे तरी शूर II" या जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या अभंगावर कीर्तन निरूपण करतांना छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास त्यांनी कथन केला. शिवाजी महाराजांचे चरित्र, चारित्र्य, धैर्य, शौर्य, चातुर्य इत्यादी अंगाने कर्तृत्व, नेतृत्व सांगतांना वर्तमानकाळ मोठा खडतर असून महापुरुषांना जाती-धर्माच्या रंगात अडकवू नये असे सांगितले. त्याचबरोबर तरुणांनी शिवराय आपल्या जीवनात आदर्श म्हणून उतरवावेत. व्यसनांचा त्याग करा, दारू पिऊ नका, गुटखा-तंबाखू खाऊ नका. व्यसनांनी समाज रसातळाला जात असून लोकांनी वेळीच सावध व्हायची वेळ आली आहे. आज आपण सावध झालो नाही तर काळ याहूनही खडतर येणार आहे. आई-वडिलांनी शिवाजी महाराजांच्याप्रमाणे आपल्या मुला-मुलींवर संस्कार करावे लागतील. असे झाल्यास शिवजयंती आणि अखंड हरिनाम सप्ताहाचे खऱ्या अर्थाने फलित होईल असे प्रतिपादन जायभाये महाराजांनी या प्रसंगी केले. या कीर्तनाला शेळगावातील तमाम भाविक भक्त, अबाल वृद्धांनी मोठ्याप्रमाणावर हजेरी लावली होती. या कीर्तनासाठी मृदंगाचार्य ह.भ.प. श्री ज्ञानराज महाराज हारकाळ, गायनाचार्य ह.भ.प. श्री परमेश्वर काका कदम, ह.भ.प.श्री राजेभाऊ महाराज चांदवडे, ह.भ.प. एकनाथ महाराज कुंभार, ह.भ.प.बबन महाराज कराड, ह.भ.प.हेंडगे महाराज, ह.भ.प.नरहरी महाराज आदी गुणिजन मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाची रूपरेषा ह.भ.प.लक्ष्मण महाराज वाघमारे यांनी केली तर संपूर्ण कार्यक्रमाचे श्री संत दर्शन या चॅनेलवरून थेट प्रक्षेपण ह.भ.प.श्री गणेश निरस यांनी केले. शेवटी छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरती आणि जयघोषाने कार्यक्रमाची सांगता झाली.







